बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | सोमवार, दि.७ ऑक्टोबर २०२४ | वर्षे ४रे | अंक ६६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

सूरज चव्हाण पाचव्या पर्वाचा महाविजेता!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बिग बॉस मराठी'चं पाचवं पर्व यंदा २८ जुलैपासून प्रेक्षकांच्या भेटीला आलं. दरवर्षी हा शो शंभर दिवस प्रेक्षकांचं मनोरंजन करतो. मात्र, यावर्षी अवघ्या ७० दिवसांमध्ये पाचव्या पर्वाचा महाविजेता घोषित केला जाणार आहे. यंदाच्या सीझनमध्ये एकूण १६ स्पर्धकांनी 'बिग बॉस'च्या चक्रव्यूहात सहभाग घेतला होता. या १६ जणांपैकी अनेक अडचणींवर मात करून फक्त सहा जणांचा घरात शेवटपर्यंत निभाव लागला. प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळवत यंदा अभिजीत सावंत, सूरज चव्हाण, निक्की तांबोळी, अंकिता प्रभू वालावलकर, धनंजय पोवार आणि जान्हवी किल्लेकर या सहा सदस्यांनी ग्रँड फिनालेमध्ये एन्ट्री घेतली होती. 'बिग बॉस मराठी'चा ग्रँड फिनाले सध्या दणक्यात सुरू आहे.

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणीकडून आरक्षण बचाव बहुजन बचाव राज्यस्तरीय संविधान जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.त्या अनुषंगाने दीक्षाभूमी ते चैत्यभूमी इथपर्यंत रॅली काढण्यात आली आहे. ही जण-जागरण रॅली रविवार (दि.६) ऑक्टोबर रोजी बीडमध्ये दाखल झाली. या रॅलीत बहुजन समाज पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते. बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे रॅलीचे स्वागत करून, बसपा पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी जनतेशी संवाद साधला.रॅलीचे प्रमुख मार्गदर्शक बहुजन समाज पार्टीचे केंद्रीय प्रदेश प्रभारी तथा माजी खा.डॉ.अशोक सिद्धार्थ, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अड.सुनिल डोंगरे या रॅलीचे नेतृत्व करत आहेत.

राज्यातील अनेक जिल्ह्यातून रॅली मार्गस्थ

नागपूर दिक्षाभूमी येथून निघालेली आरक्षण बचाव बहुजन बचाव राज्यस्तरीय संविधान जनजागरण रॅली राज्यातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली,चंद्रपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, हिंगोली परभणी, जालना, औरंगाबाद, बीड, सोलापूर अशा आदी जिल्ह्यातून मुंबई चैत्यभूमी येथे पोहोचणार आहे.

बीडमध्ये बसपाकडून जनजागरण रॅलीचे उत्स्फूर्त स्वागत

कांशी तेरी नेक कमाई, तुने सोती कौम जगाई!

जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागीदारी

दिक्षाभूमी ते चैत्यभूमी 'आरक्षण बचाव बहुजन बचाव' रॅली

प्रस्थापित सत्ताधिकारी पक्षांनी बसपाच्या रॅलीचा घेतला धसका

बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र राज्य यांच्याकडून आरक्षण बचाव बहुजन बचाव राज्यस्तरीय संविधान जनजागृती ३० सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. नागपूर दीक्षाभूमीतून निघालेली ही रॅली राज्यातील अनेक जिल्ह्यातून जनजागृती करत मुंबई चैत्यभूमी येथे पोहोचणार आहे.या रॅलीच्या माध्यमातून बहुजन समाजातील अनुसूचित जाती, जनजाती, ओबीसी, भटक्या जाती, अल्पसंख्यांक समाजातील प्रश्न व आरक्षणा संबंधित जनजागरण केले जात आहे. देशामध्ये बहुजन समाजातील शिक्षण,आरोग्य, बेरोजगारी, महागाई, नोकरी, पेन्शन इत्यादी मूलभूत समस्या सत्ताधारी, प्रस्थापित पक्षांनी सोडविलेल्या नाहीत. त्यामुळे स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतर ही अन्न, वस्त्र, निवारा आरोग्य,शिक्षण या मूलभूत गरजांसाठी जनतेला पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे ही बाब चिंतेची आहे. असे अनेक मुद्दे या रॅलीमध्ये चर्चिले जात आहेत. एकंदरीत बहुजन समाज पार्टीच्या या रॅलीमुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत सत्ताधिकारी पक्षांना निश्चितच फटका बसणार आहे. दरम्यान या रॅलीमध्ये अड. सुनील डोंगरे, प्राचार्य संतोष शिंदे, मुकुंद सोनवणे, मोहन रायकर, अब्दुल रौफ मो. युसुफ यांच्यासह आदी बसपा पदाधिकारी,कार्यकर्ते सहभागी झालेले आहेत.

भ्रामक व खोटा प्रचार

देशात नुकत्याच पार पडलेल्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीच्या संविधान रक्षण करण्याच्या भ्रम व खोट्या प्रचाराला इथला बहुजन समाज बळी पडला आहे. त्यामुळे इंडिया आघाडीला भरभरून मते दिले. परंतु या देशांमध्ये काँग्रेस पक्षाची भूमिका पूर्वीपासूनच आरक्षण विरोधी राहिलेली आहे. मग ती ओबीसीच्या मंडल आयोगा संदर्भात, मुस्लिमांच्या सच्चर कमिटीच्या रिपोर्ट संदर्भात, प्रमोशन इन आरक्षण संदर्भात असो आणि आताही ते उपा वर्गीकरणावर आपले मत स्पष्ट करताना दिसत नाहीत. असा आरोप बहुजन समाज पार्टीने जनजागरण रॅलीत केला.

येणारी पिढी सुरक्षित नाही

सरकारी संस्थाने खाजगी भांडवलदारांना शासनाकडून विकल्या जात आहेत.त्यामुळे येणारी पिढी सुरक्षित नाही. समाजातील मागासवर्ग गुलाम, लाचार व्हावा असे षडयंत्र देशात सुरू आहे. सुप्रीम कोर्टाने अलीकडेच १ऑगस्ट २०२४ रोजी दविंदर सिंग विरुद्ध पंजाब सरकार यांचे केस संदर्भात निर्णय देताना अनुसूचित जाती जनजाती वर्गाच्या समाजामध्ये उपवर्गीकरण व क्रीमियर लागू करण्याचा अधिकार राज्य सरकार यांना दिला आहे.या निर्णयाविरुद्ध बहुजन समाज पार्टीच्या अध्यक्षा बहन कुमारी मायावती यांनी सर्वप्रथम ४ ऑगस्ट २०२४ रोजी पत्रकार परिषद घेऊन हा निर्णय अनुसूचित जाती व जनजाती करिता घातक आहे. परिणामी हा निर्णय जाती-जातीमध्ये भांडणे लावणारा असून यामागे आरक्षण संपविण्याचे षडयंत्र आहे असा आरोप केला होता.

बीड बसपाकडून यांनी केलं नियोजन

दीक्षाभूमी ते चैत्यभूमी निघालेली राज्यस्तरीय संविधान जनजागरण रॅली, रविवारी बीडमध्ये दाखल झाली. या रॅलीच्या कार्यक्रमात आणि नियोजनात कोणतीही उणीव राहणार नाही. यासाठी बीड बहुजन समाज पार्टी पदाधिकारी,कार्यकर्ते यांनी सुयोग्य नियोजन केले होते. त्यांच्या या नियोजनातून या रॅलीचे बीडमध्ये उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे रॅलीत उपस्थित मान्यवरांनी देशातील आजची परिस्थिती यावर भाष्य करत, बहुजन समाजाने जागृत होण्याची नितांत गरज आहे असे आवाहन केले.

भाजप,काँग्रेस एकाच नाण्याच्य बाजू!

देशाच्या विकासासंदर्भात सूक्ष्म निरीक्षण केले तर स्पष्ट दिसून येते की भाजप आणि काँग्रेस पक्ष एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत एक सपनाथ आहे तर दुसरा नागनाथ आहे. म्हणून बहुजन समाजाने या पक्षांच्या भूलथापांना बळी पडू नये. अशी स्पष्ट भूमिका बहुजन समाज पार्टीकडून जनजागरण रॅलीत मांडली जात आहे.

गेवराईत आ.अण्णांचा विकासाचा धुमधडाका

धोरण: रस्ता सुधारणा योजनेअंतर्गत कोटींचा निधी

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

आमदार लक्ष्मण पवार यांनी गेवराई तालुक्यात विकास कामाचा धडाका लावला असून अनेक ग्रामीण भागात रस्त्याचे दर्जे दार जाळे तयार करून ग्रामीण भागालाही न्याय देण्याचे काम केले त्यामुळे आमदार पवार यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या माध्यमातून गेवराई तालुक्यातील एन एच६१ मंगरूळ रस्ता, जातेगाव मुख्य रस्ता ते माळहिरवा, मादळमोही ते मानमोडी, चकलांबा ते तरटगव्हाण रस्ता, रामा- ६२ ते रसुराबाद रस्ता व चकलांबा ते बाळानाईक तांडा असे एकूण रस्ता सुधार योजना अंतर्गत १७ कोटी रुपये रस्ता कामाचा भव्य उद्घाटन समारंभ दि.७-१०-२४ रोजी गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मागील अनेक वर्षापासून या भागातील

नागरिकांची रस्त्याची मागणी होती अत्यंत खराब रस्त्याहून त्यांना गावाकडे ये जा करावे लागत होते परंतु त्यांची ही अडचण आमदार लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून आता दूर झाली असून लवकरच त्यांना दर्जे दार रस्ता तयार करण्यात येणार आहे त्यामुळे या भागातील नागरिकांतून आमदार पवार यांचे कौतुक होत असून त्यांची लोकप्रियता वाढली आहे.

चिमुरडीवर अत्याचार करणारा शिक्षक अटक

निषेधनिय: संस्था चालकाला वाचवण्याचा प्रयत्न

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील एका शाळेत अल्पवयीन साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी त्याच शाळेतील नराधम शिक्षकास पोलिसांनी अटक केली आहे. राहुल अंबादास वायखिंडे मूळ रा. ब्रह्मगाव ता. कोपरगाव जि. अहील्यानगर असे आरोपीचे नाव असून त्यास ४ दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली आहे. दरम्यान शहरवासीयांच्या वतीने उद्या सोमवारी माजलगाव बंदचे आवाहन करण्यात आले आहे.राज्यात शाळेत शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलींवर अत्याचाराच्या घटनांची मालिका सुरूच असून बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील एका शाळेतील बालवाडीत साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना २५ ते २८ सप्टेंबर दरम्यान घडली. या घटनेप्रकरणी मुलीच्या पालकांच्या तक्रारीवरून गुरूवारी अज्ञात

पान २ वर...

आज माजलगाव बंदचे आव्हान

चिमुरडीवर अत्याचार प्रकरणाचे आता तीव्र प्रतिसाद उमटत असून या घटनेप्रकरणी शहरवासी यांच्या वतीने संबंधित घटनेतील संपूर्ण आरोपींना व संस्था चालकांना कडक शासन करण्यात यावे यासाठी माजलगाव शहरवासीयांतर्फे उद्या दि.७ सोमवारी माजलगाव शहर बंद व मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून हनुमान चौक भागातून हा मोर्चा शहर पोलीस स्टेशन ते तहसील कार्यालयावर नेण्यात येणार असल्याचे निवेदन पोलीस ठाण्यात देण्यात आले. या निवेदनावर सुरेंद्र रेदासनी, कल्याण आबुज, रत्नाकर कुलथे, विलास नेमाने, रामराव दहिवाळ, गजानन बोकन, राजेंद्र टाक, वैजनाथ दहिवाळ, शशिकांत डहाळे, गणेश शहाणे, अजय दहिवाळ, अक्षय आंबिलवादे, लक्ष्मीकांत राम करण कुलथे, अनिकेत आंबीलवादे, मोहित दळवी, रामेश्वर कुलथे, विजयप्रकाश कुलथे, विकास उदावंत, राजू उदावंत, नारायण सातपुते आदींसह अनेकांच्या स्वाक्षरी आहेत.

बीडमध्ये विधानसभा संवाद दौरा!

जगताप, मुळूक: शिवसैनिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा सभा निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या असताना आचार संहिता लागू होण्या अगोदर शिवसेना नेते संसदरत्न खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांचा येत्या मंगळवारी दि. ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.०० वाजता शहरातील आशीर्वाद मंगल कार्यलय बार्शी रोड येथे बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी दिली आहे. यासंदर्भात दोन दिवसांपूर्वीच शिवसेना उप नेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांच्या

प्रमुख उपस्थितीमध्ये मेळाव्याच्या पूर्व तयारी साठीची बैठक देखील पार पडली. या बैठकीमध्ये अर्जुनजी खोतकर साहेब यांनी खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब बीड मतदार संघात

पान २ वर...

दुर्घटना तीन जणांचा मृत्यू, २३० जणांची प्रकृती चिंताजनक

चेन्नईमध्ये एअर शो पाहण्यासाठी लाखोंची गर्दी

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय हवाई दलाच्या ९२ व्या वर्धापन दिनानिमित्त चेन्नईमध्ये एका एअर शोचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या शो दरम्यान डिहायड्रेशनमुळे तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तसेच तब्बल २३० जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या घटनेत श्रीनिवासन (४८,रा. पेरुंगलाथूर), कार्तिकेयन (३४) तिरुवोट्टीयुर आणि जॉन (५६) रा.कोरुकुपेट अशी मृत्यू झालेल्या तिघांची नावे असल्याची माहिती समोर आली आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, भारतीय हवाई दलाच्या या एअर शोचा लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश करण्यात येणार होता. हा शो पाहण्यासाठी या ठिकाणी तब्बल १६ लाख लोकांची गर्दी जमली होती. हा शो सकाळी ११ वाजता सुरु झाला होता. त्यानंतर दोन तास हा शो सुरु होता. मात्र, हा कार्यक्रम पाहण्यासाठी सकाळी ८ वाजल्यापासूनच लोक चेन्नईमधील मरीना बीचवर जमले होते.यावेळी एवढ्या मोठ्या लोकांचं नियोजन योग्य पद्धतीने झाले नाही आणि लाखो लोक गर्दीत अडकले. शहरातील विविध भागात गर्दीमुळे तास लाखो फसले होते. एवढ्या मोठ्या संख्येने लोक एकत्र आल्यामुळे आणि गर्दीत पाणी न मिळाल्यामुळे लोकांना त्रास व्हायला लागला आणि काहींची प्रकृती बिघडली. गर्दीमुळे त्या

पान २ वर...

रस्ता सुधार योजने अंतर्गत
१७ कोटी
रुपयांच्या रस्ता कामाचा
उद्घाटन शुभारंभ
* उद्घाटक *
आ.लक्ष्मण (आण्णा) पवार
(गेवराई विधानसभा मतदार संघ)

एन.एच ६१ ते मंगरूळ रस्ता लांबी - ०/०० ते ४/००० कि.मी. किंमत - ६ कोटी
दि.०७/१०/२०२४ रोजी स.१० : ०० वा. ठिकाण : मंगरूळ

चकलांबा ते तरटगव्हाण रस्ता लांबी - ०/०० ते ०५/००० कि.मी. किंमत - २ कोटी ५० लक्ष
दि.०७/१०/२०२४ रोजी दु.३ : ०० वा. ठिकाण : रसुलाबाद फाटा

जातेगाव मुख्य रस्ता ते माळहिवरा लांबी - ०/०० ते १/५०० कि.मी. किंमत - १ कोटी ७५ लक्ष
दि.०७/१०/२०२४ रोजी दु.१२ : ०० वा. ठिकाण : माळहिवरा

रामा-६२ ते रसुलाबाद रस्ता लांबी - ०/०० ते १/५०० कि.मी. किंमत - १ कोटी २५ लक्ष
दि.०७/१०/२०२४ रोजी दु. ३ : ३० वा. ठिकाण : रसुलाबाद

मादळमोही ते मानमोडी लांबी - ०/०० ते १०/०० कि.मी. किंमत - ३ कोटी ५० लक्ष
दि.०७/१०/२०२४ रोजी दु.१:३० : ०० वा. ठिकाण : मानमोडी

चकलांबा ते बालानाईक तांडा लांबी - ०/०० ते २/५०० कि.मी. किंमत -२ कोटी
दि.०७/१०/२०२४ रोजी दु.०४ : ३० वा. ठिकाण : बालानाईक तांडा

एजन्सी :- राजविर कन्स्ट्रक्शन गेवराई
Mauli Printers,Georai

निष्क्रिय सज्जनांचा श्राद्धदिन

पश्चिम आशियातील नरसंहारातून नेतान्याहू यांची बेमुर्वतखोरी जितकी दिसते त्यापेक्षा अधिक अमेरिका नामे महासत्तेची अगतिकता प्रकर्षाने उघड होतेगतवर्षी याच दिवशी (७ ऑक्टोबर) हमास या दहशतवादी संघटनेच्या आततायी नेतृत्वाने इस्रायलवर अत्यंत निंदनीय नृशंस असा हल्ला केला आणि स्वत:च्या पायावर धोंडा नव्हे, तर कुऱ्हाड मारून घेतली. त्यात हजारांहून अधिक निरपराध यहुदी हकनाक मारले गेले. त्यामुळे मुळात युद्धखोर प्रवृत्तीच्या, देशांतर्गत राजकारणात गंभीर संकटात सापडलेल्या इस्रायली पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना आयतीच संधी मिळाली. त्याचे वर्णन ‘लोकसत्ता’ने गतवर्षीच्या संपादकीयात ‘बिबिंचा पुलवामा’ असे केले. ते किती सार्थ होते आणि आहे हे हत्याधुंद नेतान्याहू यांच्या सध्याच्या परिस्थितीवरून ध्यानी येईल. गेल्या वर्षभरात हमासच्या कृतीने उद्युक्त होऊन नेतान्याहू यांनी सुरू केलेल्या चौफेर हल्ल्यात पन्नासएक हजारांचे प्राण गेले. तरीही नेतान्याहू यांची भूक शांत होताना दिसत नाही आणि इस्रायलची समस्याही मिटताना दिसत नाही. जे झाले, जे सुरू त्यावर ‘लोकसत्ता’ने गेल्या वर्षभरात वेळोवेळी भाष्य केले. त्यामुळे त्या मुद्द्यांची पुनरुक्ती टाळून त्यापेक्षा जे सुरू आहे त्यात पश्चिम आशियातील अभागी जनांशिवाय कोण आणि काय बळी गेले याचा धांडोळा घेणे गरजेचे आहे.

नेतान्याहू यांच्या कृतींच्या अप्रत्यक्ष बळींत सर्वात पहिले नाव आहे ते अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन. इस्रायलच्या कृतींने बायडेनबाबांस मेल्याहून मेल्यासारखे करून टाकले. निकोलस क्रिस्टॉफ यांच्यासारखा नेमस्त आणि अत्यंत अभ्यासू भाष्यकार ‘न्यू यॉर्क टाइम्स’मध्ये बायडेन यांच्या सध्याच्या अवस्थेचे वर्णन ‘‘ग्राऊची अँड इम्पोटंट अ सेल्फ डिमिनिशिंग प्रेसिडेंट’’ (करवादलेला आणि नपुंसक स्वकर्माने आकसत चाललेला अध्यक्ष) अशा टोकदारपणे करतो त्यावरून बायडेन आणि त्यामुळे अमेरिका यांचे किती नुकसान नेतान्याहू यांनी केले आहे हे लक्षात येते. हा बायडेन यांचा जसा व्यक्तिगत ऱ्हास आहे त्यापेक्षा अधिक ही अमेरिकेची क्षती आहे. पश्चिम आशियातील नरसंहारातून नेतान्याहू यांची बेमुर्वतखोरी जितकी दिसते त्यापेक्षा अधिक अमेरिका नामे महासत्तेची अगतिकता प्रकर्षाने उघड होते. याचा फटका आगामी अध्यक्षीय निवडणुकांत बायडेन यांच्या डेमॉक्रॅटिक पक्षास किती बसणार हे आणखी महिनाभरात कळेलच. अमेरिकेच्या ‘स्विंग स्टेट्स’ (म्हणजे निकाल बदलवू शकणारी राज्ये) नावाने ओळखल्या जाणाऱ्या काही राज्यांत अरब आणि पश्चिम आशियातून आलेले नागरिक मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यांना बायडेन यांची निष्क्रियता अजिबात रुचलेली नाही. हे वास्तव लक्षात घेऊनच डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांनी या सर्वास चुचकारण्याचा प्रयत्न सुरू केला आणि नेतान्याहू यांच्याविरोधात कडक भूमिका घेतली. त्यावरून त्यांचे वळण लक्षात येते. त्यावरून पश्चिम आशिया आणि विशेषत: इस्रायलच्या मुद्द्यावर हॅरिस या ओबामा यांच्या मार्गाने जातील अशी लक्षणे आहेत. याचा अर्थ ओबामांच्या काळात ज्या प्रमाणे नेतान्याहू यांचे फाजील लाड अमेरिकेने केले नाहीत; त्या प्रमाणे अध्यक्षपदी निवडून आल्यास हॅरिस यादेखील नेतान्याहू आणि इस्रायल यांची फार पत्रास ठेवणार नाहीत, असे मानण्यास जागा आहे. त्याचमुळे अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकांआधी अधिकाधिक संहार करवून घ्यावा, आपले मनसुबे पूर्ण करून घ्यावेत असा नेतान्याहू यांचा प्रयत्न दिसतो. त्यात त्यांचे यश दुहेरी आहे. एक म्हणजे मनसोक्त संहार आणि दुसरे म्हणजे या युद्धाची व्याप्ती वाढवणे. यातील पहिल्याविषयी अधिक लिहिण्याची गरज नाही. आणि दुसऱ्याविषयी लिहायला हवे याचे कारण ही ज्याप्रमाणे इस्रायलची इच्छा आहे त्याचप्रमाणे ती मनीषा हमास, हेझबोल्ला आणि इराण यांचीदेखील आहे. ज्या वेळी दहशतवादी आणि त्यांस कथित विरोध करणारे हे एकाच प्रतलावर असतात त्या वेळी त्या संघर्षाचा फोलपणा ठसठशीतपणे दिसून येतो.उदाहरणार्थ गाझा पट्ट्यातील २२ लाख पॅलेस्टिनींची आजची अवस्था ही १९४८ सालच्या परिस्थितीपेक्षाही गंभीर आहे. त्या वेळी इस्रायल अस्तित्वात येताना झालेल्या हिंसाचारात १५ हजार पॅलेस्टिनी मारले गेले आणि ७.५ लाख पॅलेस्टिनी निर्वासित झाले. तर गेल्या वर्षभरातील हिंसाचारात ४५ हजारांहून अधिकांचा बळी गेला आहे आणि तेथे उरलेले पॅलेस्टिनी १९४८ सालापेक्षाही अधिक आज असाहाय्य आहेत. आपल्या मातृभूमीतच या सर्वांवर पुन्हा एकदा बेघर होण्याची वेळ ताज्या युद्धाने आणली. याचा सर्वात मोठा फायदा कोणास होत असेल तर तो हमास या संघटनेस. जगभरात या संघटनेच्या समर्थकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असून अमेरिकी निष्क्रियता आणि इस्रायलची अमानुषता यांस रोखण्यासाठी ‘हमास’चे हात बळकट करण्यास पर्याय नाही अशी भावना परदेशस्थ पॅलेस्टिनींत जोर धरू लागली आहे. इंग्लंड, फ्रान्स, अन्य युरोपीय देश, अमेरिका आदी ठिकाणी पॅलेस्टिनी मोठ्या संख्येने विखुरलेले आहेत आणि त्यांच्यातील संघटन दृढ होऊ लागलेले आहे. लंडनसारख्या ठिकाणी तर मध्यवर्ती ‘पॅलेस्टिन हाऊस’मधील वाढत्या वर्दळीवर अलीकडेच स्थानिक माध्यमांनी विस्तृत वृत्तांत प्रसिद्ध केले. तेथून पॅलेस्टिनी नभोवाणी, माहिती केंद्र आदी ‘सेवा’ चालवल्या जातात. विविध संस्थांनी गेल्या काही दिवसांत आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध ठिकाणी जनमताचे कौल घेतले. त्या सर्व पाहण्यांत इस्रायलविरोधी भावना पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर वाढीस लागल्याचे दिसून येतेच; पण इस्रायलचा मुकाबला करण्यासाठी विद्यमान पॅलेस्टिनी प्रशासन आणि अध्यक्ष महमूद अब्बास हे किती नेभळट आहेत असे मत प्राधान्याने व्यक्त होताना दिसते. याच्या जोडीने शेजारील अनेक देशांत इस्लामी कट्टरपंथीयदेखील आपला पाया विस्तारताना दिसतात.

दिव्यांगांच्या चेहर्यावर हास्य फुलले!

निलम शिर्के:बीडमध्ये दिव्यांग महोत्सवास प्रतिसाद

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिव्यांग मुलांच्या चेहर्यावरील आनंद पाहण्यात वेगळेच समाधान असते. ही मुले निरागस असून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे काम बालरंगभूमी परिषदेने केले आहे, असे प्रतिपादन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलम शिर्के सामंत यांनी केले.

बीडमध्ये बालरंगभूमी परिषद आयोजित ‘यहाँ के हम सिकंदर’ दिव्यांग महोत्सव शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयात शनिवारी (दि.५) उत्साहात झाला. मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून निलम शिर्के सामंत ह्या बोलत होत्या. व्यासपीठावर स्वागताध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष डॉ. दिपाताई क्षीरसागर, संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांताध्यक्ष स्नेहल पाठक, सावरकर महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रिती पोहेकर, महोत्सव समितीच्या सदस्य दिपाली शेळके, बालरंगभूमी परिषदेचे प्रमुख कार्यवाह संजय पाटील देवळाणकर, अनुराधा चिंचोलकर, शाहीर विलास सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. निलम शिर्के सामंत म्हणाल्या की, राज्यात दिव्यांग महोत्सवाची सुरूवात सर्व प्रथम बीड शाखेच्या अध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून होत आहे. महोत्सवाचे हे पहिले वर्ष असून पुढील वर्षी यापेक्षा आणखी उत्तम नियोजन केले जाईल. दिव्यांग मुलांच्या पालनपोषणात आईनंतर शिक्षकाचा मोलाचा वाटा असतो. त्यामुळे दिव्यांग शिक्षकांनी पुढे येऊन बालरंगभूमी परिषदेला सूचना कराव्यात. सूचना विचारात घेऊन आणखी मोठा दिव्यांग महोत्सव आयोजित केला जाईल, असेही त्या म्हणाल्या. स्वागताध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, महोत्सवातून दिव्यांग मुलांच्या कलागुणांना वाव मिळणार आहे. दिव्यांग बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दिव्यांग महोत्सव हा स्तुत्य उपक्रम आहे, असे ते म्हणाले. प्रास्ताविक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले. सुत्रसंचलन डॉ.संजय पाटील देवळाककर यांनी केले. आभार स्नेहल पालक यांनी मानले.

आकाशात फुगे सोडून लुटला आनंद

कार्यक्रमापूर्वी प्रांगणावर दिव्यांग मुलांच्या हस्ते फुगे आकाशात सोडून आनंद लुटला. बीड जिल्ह्यातील २३ शाळेतील २६१ दिव्यांग कलाकारांसह शिक्षकांचा सहभाग होता. यावेळी सांस्कृतिक नृत्य, एकांकिका, नाट्य, विविध गीते सादर करत आपली कला सादर केली. या दिव्यांग महोत्सवाचा दिव्यांग मुलांनी कार्यक्रमाचा आनंद लुटला. तसेच, दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरवले होते. या प्रदर्शनाला निलम शिर्के सामंत यांनी भेट देऊन त्यांचे कौतुक केले. प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी वस्तूंची खरेदी केली. यामुळे दिव्यांग मुलांच्या चेहर्यावर आनंद पहावयास मिळाला.

नाळ जोडणे महोत्सवाचा उद्देश-डॉ.क्षीरसागर

डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या की, दिव्यांग बालकांसाठी अ‍ॅड.निलम शिर्के सामंत यांचे मोठे कार्य आहे. दिव्यांग बालकांच्या चेहर्यावर हास्य फुलविण्याचे लाख मोलाचे कार्य त्यांच्या हातून होत आहे. परिषदेचा लोककला महोत्सव असो की दिव्यांग महोत्सव असा प्रत्येक उपक्रम राज्यात सर्वप्रथम बीडमधून राबविण्याची परंपरा यापुढे ही कायम ठेवू असे त्यांनी सांगितले.

स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासारखा निष्काम कर्मयोग करता आला पाहिजे -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई /पुण्यभूमी प्रतिनिधी

स्वामी रामानंद तिर्थ यांनी एकाच वेळी बलाढ्य ब्रिटिश सत्तेशी सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात लढाई केली. हे कार्य करीत असताना त्यांनी सर्वसामान्य जनतेशी नाळ जुळवून ठेवल्याने, सर्वसामान्य जनतेने त्यांना दोन वेळा वेगवेगळे ठिकाणाहून निवडून दिले. या पदांचा उपयोग त्यांनी स्वतःसाठी न करता जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी, जनतेच्या हितासाठी केल्याने हैद्राबाद संस्थान निजामापासून मुक्त झाले तसेच मराठवाड्याला महाराष्ट्र मध्ये विलीन होण्याची संधी लाभली. याचे श्रेय केवळ स्वामी रामानंद तीर्थ यांच्या निष्काम कर्मयोगाला आहे त्यामुळे राजकारणात, समाजकारणात शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींनी त्यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून निष्काम कर्मयोगी बनण्याचा प्रयत्न करावा असे वक्तव्य सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

शहरातील कर्तव्य मतिमंद मुलांच्या निवासी वसतीगृहावर आयोजित स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवकुमार निर्मळे, संस्थेचे अध्यक्ष संभाजीराव लांडे तसेच अभियंता श्री पुरी यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाची सुरूवात परमपूज्य स्वामी रामानंद तीर्थ तसेच बाबासाहेब परांजपे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जीवन कार्यावर,विविध जीवन पैलूंवर प्रकाश टाकत स्वामी रामानंद तीर्थ हे खऱ्या अर्थाने जनताचे लोकनायक होते हे स्पष्ट केले. त्या काळामध्ये तीन विषयांमध्ये पदवी प्राप्त करणारा तसेच एम.ए.विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त करणारे स्वामी रामानंद तीर्थ यांनी अंबाजोगाईच्या योगेश्वरी शिक्षण संस्थेत मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले ही अंबाजोगाईच्या दृष्टीने अत्यंत गौरवाची आणि गर्वाची गोष्ट आहे त्यामुळे येथील शैक्षणिक संस्थांनी त्यांचा हा ऐतिहासिक वारसा जपण्याचे काम करावे असे आवाहन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केले.

देशामध्ये मुली या आईच्या पोटात सुद्धा सुरक्षित नाहीत अशा प्रसंगी संभाजीराव लांडे सर हे विकलांग मुलींना सांभाळत आहेत, पोटच्या मुलींप्रमाणे जपत आहेत ही बाब स्वामी रामानंद तीर्थ यांच्या निष्काम कर्मयोगाचा वारसा पुढे नेण्यासारखे आहे या शब्दांत संभाजीराव लांडे यांचा गौरवोद्गार केला. यावेळी बोलताना सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवकुमार निर्मळे यांनी स्वामीजी हे एक उत्तुंग व्यक्तिमत्व होते त्यांचा परिस्पर्श योगेश्वरी शिक्षण संस्थेला झाल्याने योगेश्वरी शिक्षण संस्था ही गौरवशाली इतिहासाची ऐतिहासिक साक्षीदार आहे या शिक्षण संस्थेचा मुख्याध्यापक म्हणून कार्य करण्याचे भाग्य मला लाभले हा मी माझा गौरव समजतो असे भावस्पर्शी उद्गार काढले. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या या कार्याचा वारसा जपण्याचे काम योगेश्वरी शिक्षण संस्था ताकदीने करीत आहे आणि यापुढे ही करीत राहील असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

अध्यक्षीय समारोप करताना संभाजीराव लांडे यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांचे कार्य अथांग सागराप्रमाणे आहे. त्यांनी सामाजिक शैक्षणिक राजकीय सांस्कृतिक क्षेत्रात ज्या ताकदीने काम केले. त्या विचारांचा वारसा कर्तव्य मतिमंद मुलींच्या निवासी वसतीगृहामध्ये कार्यरत असलेला प्रत्येक कर्मचारी आपल्या परीने जपण्याचे काम करत आहे व करीत राहील अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता चौधरी यांनी केले तर उपस्थितांचे आभार मनीषा गांगुर्डे यांनी मानले.

पान एक वरून

चिमुरडीवर अत्याचार करणारा

व्यक्ती विरोधात लैंगिक अत्याचार गुन्हा दाखल करण्यात आला. तर शहरात सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.माजलगाव शहरात एका शाळेत बालवाडी आहे. त्यामध्ये परिसरातील लहान मुले मुली दररोज येतात या परिसरातीलच एक साडेपाच वर्षाची चिमुरडी नियमित शाळेत येते तिला शाळेतील एका अज्ञात इसमाने दि. २५ ते २८ सप्टेंबर रोजी डबा खाल्यानंतर अत्याचार केला. घटनेनंतर चिमुरडी ताप येऊन आजारी पडली त्यामुळे तिला दवाखान्यात उपचार करण्यात आले. घरी आल्यावर तिने शाळेत झालेली ही गोष्ट आपल्या पालकांना सांगितली. पांढरे कपडे घातलेला माणसाला मी ओळखते असेही सांगितले. या घटनेनंतर चिमूरडीच्या पालकांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुरूवारी तक्रार दिली त्यानुसार अज्ञात व्यक्ती विरुद्ध लैंगिक अत्याचार पोस्को गून्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेनंतर पोलिसांनी सदरील अल्पवयीन मुलीची अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली तर या घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय अधिकारी धीरजकुमार बच्चू व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचे सह पोलीस उपनिरीक्षक सुनील दिंडे यांनी सदरील शाळेची चौकशी करून तेथील सीसीटीव्ही ची तपासणी केली तसेच या शाळेतील सर्व शिक्षकांची ओळख परेड घेतली तसेच शिक्षकांच्या फोटो मधून सदरील चिमुरडीने आरोपी शिक्षकाचा फोटो पाहून त्याची ओळख पटवली त्यानंतर पोलिसांनी संबंधित शिक्षक राहुल अंबादास वायखिंडे सध्या रां. माजलगाव मूळ रा. ब्रह्मगाव ता. कोपरगाव जि. (अहमदनगर) अहील्यानगर यास अटक केली आहे. दरम्यान या आरोपीस न्यायालयासमोर उभे केले असता न्यायदंडाधिकारी धर्माधिकारी यांनी चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

बीडमध्ये विधानसभा संवाद

पहिल्यांदा येत असून त्यांच्या विधानसभा संवाद दौरा मेळाव्या बाबत महत्वपूर्ण सूचना मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या सूचनेनुसार बीड शिवसेना महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनेचे आजी- माजी पदाधिकारी- लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या उत्साहाने कामाला लागले असून डॉ श्रीकांत शिंदे यांचा विधानसभा संवाद दौरा मेळावा अत्यंत शिस्तीत आणि नियोजनबद्ध पार पडेल असे बीड शिवसेनेच्या वतीने सांगण्यात आले असून बीड जिल्ह्यातील सर्व शिवसैनिकांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

चेन्नईमध्ये एअर शो पाहण्यासाठी

ठिकाणी असणाऱ्या पाणी विक्रेत्यांना हटवण्यात आले होते. दरम्यान, हा कार्यक्रम संपल्यानंतर घरी परतत असताना लाखो नागरीक एकत्र बाहेर पडल्यामुळे ही घटना घडल्याचंही सांगितलं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. दरम्यान, ज्या ठिकाणी लाखो लोक जमले होते, त्या ठिकाणी जवळपास पाणी पिण्याची व्यवस्था नसल्यांचही आता सांगितलं जात आहे. त्यामुळे शो संपताच मोठ्या प्रमाणात लोक बाहेर पडण्यासाठी जमा झाले, यामुळे तेथील वाहतूकही ठप्प झाली होती. लाखो लोकांच्या गर्दीमुळे शहरातील अनेक रस्ते तासंतास ठप्प झाले होते. काही रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी झाल्याचंही सांगण्यात आलं.

पान सहा वरून

तुतारीच्या उमेदवारीसाठी

देखील महाविकास आघाडी कडून उमेदवारीसाठी प्रयत्न करत आहेत. शरद पवार व पक्षाच्या जेष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत त्यांनी शेकडो कार्यकर्त्या समावेत काही दिवसापुर्वीच शरद पवार राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे . राजेभाऊ फड तिकीटाच्या खुप जवळ आहेत असे बोलल्या जात आहे . त्यांच्या सासुबाई सौ.गुट्टे ह्या देखील मागे नाहीत. शरद पवारां पासून ते पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या संपर्कात त्या आहेत. महाविकास आघाडीच्या तिकीटासाठी खेचाखेच अशी परिस्थिती सासू - जावया मध्ये परळी मतदारसंघात दिसुन येत आहे . फड यांनी मतदारसंघात गाठी भेटी सुरु केल्या आहेत. सौ.गुट्टे व त्यांचा मुलगा सुनील गुट्टे यांनी तर शेतकरी संवाद यात्रा काढत परळी मतदारसंघातील गावा गावात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. महाविकास आघाडी तर्फे तिकिसाठी सर्व इच्छूका पैकी सासू - जावयात अधिक स्पर्धा लागली आहे . सद्या तरी परळी मतदारसंघात तिकीटाच्या स्पर्धेत सासू - जावई आघाडीवर आहेत.

साडेतीन लाखाचे सोयाबीन

पेटवून देऊन अज्ञात व्यक्ती पसार झाला सकाळी ७ वाजता शेजारी अबून पठाण यांनी फोन करून सांगितले की तुमच्या शेतातील सोयाबीनच्या तिन्ही गंजी जळून खाक शेतातील सोयाबीनच्या तिन्ही गंजी जळून खाक झाल्या आहे त्यावेळी ते राहत्या घरी कळंब या ठिकाणी होते तात्काळ तिन्ही शेतकरी शेतावर आले असता संपूर्ण सोयाबीनची राख झाली होती यामुळे सदरील शेतकरी यांचे जवळपास साडेतीन ते चार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे सदरील अज्ञात व्यक्तीने जाळलेल्या सोयाबीन पिकाचा पंचनामा करुन आमच्या झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई ची मागणी शेतकरी शेख नसिब शेख हबीब शेख बशिर शेख हवीब , शेख शफिक शेख नसिब यांनी निवेदनाद्वारे केज तहसील कार्यालय यांच्याकडे केली आहे व केज पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

मनोज जरांगे पाटीलांची

राहणार आहे असे दादांना माहिती दिली व आशीर्वाद घेऊन आपल्या गावी परतवून जनजागृती अभियान दसऱ्या मेळाव्याचे आखत आहे तरी या दसऱ्याच्या कोटीच्या संख्येने बहुजन समाजातील असंख्य कार्यकर्ते स्वामी होणार आहे त, १८ पगड जातीमधील लोकांना हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्यानंतर अठरापगड जाती जमातीतील नागरिकांना सोबत घेऊन जर चालणार कोणी असेल तर ते मनोज जरांगे दादा पाटील आहे असे त्यांना विश्वास वाटतो म्हणून ते सुद्धा अंतरवेली सराटी गावाला तीर्थक्षेत्र व आमचा विठ्ठल मनोज दादा जरांगे आहे असे ते ठणकावून सांगितले.

रिपाइं मध्यस्तीने उपोषण

कुठलीही अडचण येणार नाही याची काळजी घेण्याचे आदेशही दीपक भाऊंनी जिल्हाध्यक्षांना दिलेले आहेत हे त्यांनी त्या ठिकाणी नमूद केले नंदुभाऊ ससाणे यांनी कामगारांच्या व्यथा इथे मांडण्याचे काम केले आहे आणि या अगोदरही वेळोवेळी कामगारांसाठी जे काही केलेले काम आहे ते सर्वांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न केला या उपोषणास उपस्थित असलेले सचिन जी घोडके रिपब्लिकन पार्टी ऑफ ये जिल्हा उपाध्यक्ष अहमदनगर दक्षिण, गणेश जी सांगळे जिल्हा संघटक, नाना सांगळे जिल्हा सहसंघटक, फरीद इनामदार, अक्षय लागडे, विकास शिंदे, संदीप घोडके, मयूर घोडके, शुभम आठवले, आपला काळे, पहिला काळे, पिनू ससाने, बाबू ससाने, जय ससाने, सुभाष ससाने, अमृत काळे, संतोष ससाने, महादेव ससाने, मयूर ससाने, साहिल ससाने, नागेश उमाप, बबन ससाने, दीपक ससाने,सतीश ससाने,नितीन घोडके, मयूर संजीवन घोडके, आकाश घोडके, मोहन कोथिंबिरे

महिलांच्या कलागुणांना होम

प्रयत्न म्हणून न्यू होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने महिलांचा वाढलेल्या सामाजिक वावर यामुळे त्यांना स्थानिक समस्या, समाजाचे प्रश्न याविषयीची त्यांची जाणीव वाढीस लागावी यामाध्यमातून अपणासर्वांना बीडचा विकास साधण्याची दूरदृष्टी मिळावी हेच अपेक्षा आहे. त्याचबरोबर कार्यक्रमा दिवशी महिलांना आर्थिक साक्षरतेबाबत माहिती देण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास महिलांनी जास्तीत जास्त संख्येने आपला सहभाग नोंदवावा असे डॉ.ज्योती मेटे यांनी म्हंटले आहे.

मातंग समाज अधिकार मोर्चात

आरक्षण लागू करावे.उसतोड कामगारांच्या मुलांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात यावे. आदी मागण्या करण्यात येणार आहेत. या प्रमुख मागण्यासाठी दि. ११ ऑक्टोबर रोजी ठीक ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालय माजलगाव येथे धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे तरी हजारोच्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन अमोल शेरकर यांनी केले आहे.

मुंदडा राजकारणाला

संपुर्ण मतदार संघाला माहिती आहे. आता जनतेलाच हवा आहे मुंदडा विरोधातला सक्षम उमेदवार. जो पक्ष बलाढ्य उमेदवार देईल त्यालाच जनता साथ दिल्याशिवाय आणि मुंदडा घराण्याला घरी पाठवल्या शिवाय राहणार नाही.

एज्युकेशन सोसायटीचा

कर्तव्य उत्कृष्टपणे पार पाडले. बऱ्याच विद्यार्थी आणि पालकांनी त्यांचे विचार सामायिक केले की त्यांनी पहिल्यांदाच ओएमआर शीटद्वारे सीरत अन नबीच्या परीक्षेला सामोरे गेलेले आहे, जे त्यांनी फक्त सरकारी परीक्षा किंवा नोकऱ्यांच्या भरतीमध्ये पाहिले आहे. हे खरोखरच सहभागींसाठी अनुभव वाढवणारे होते. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी इयत्ता १ ली ते ४ थी साठी नात स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा सकाळी १०:०० ते २:०० या वेळेत तर दुपारी ३:०० ते ७:०० या वेळेत इयत्ता ५वी ते ७वी च्या वर्गासाठी पहिली फेरीची प्रश्नमंजुषा स्पर्धा होणार आहे, दोन्ही कार्यक्रम लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिरात होणार आहेत.६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी २:०० पर्यंत इयत्ता ८ वी ते १० पर्यंत प्रश्नमंजुषा स्पर्धा (फक्त मुले) आणि दुपारी ३:०० ते रात्री ७:०० पर्यंत इयत्ता ८ वी ते १० पर्यंत प्रश्नमंजुषा स्पर्धा (फक्त मुलींची) त्याच ठिकाणी घेण्यात येईल. बक्षीस वितरण समारंभ आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेची अंतिम फेरी ७ ऑक्टोबर रोजी दुपारी २:०० ते ५:०० या वेळेत होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दोन्ही संस्थांचे सर्व मुख्याध्यापक सय्यद वाजेद सर, मुख्याध्यापिका सय्यद नाजनीन बाजी, सिद्दीकी नुसरत बाजी आणि नुजहत बाजी हे प्रयत्नशील आहेत.हया सीरत-उन नबी कार्यक्रमांच्या सर्व स्पर्धा मध्ये उर्दू माध्यमाच्या सर्व शाळांनी सहभाग घेतलेला आहे. महेबूबिया एज्युकेशन सोसायटीचे सचिव सय्यद हनिफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई आणि दोन्ही सोसायटीच्या सर्व सदस्यांनी सर्व उर्दू माध्यम शाळा आणि व्यवस्थापन समित्यांनी या सीरत-उन-नबी उत्सवात सहभागी होऊन या भव्य सीरत-उन नबी उत्सवाच्या कार्यक्रमाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

वीजकेंद्राच्या भारनियमनाने ग्रामस्थ त्रस्त!

दुर्लक्ष उद्योजक, नागरिक झाले परेशान

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगावसह परिसरात सर्वच वीज उपकेंद्रातून अघोषित भारनियमनाने ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त झाले आहेत. भारनियमनाने विजेवर चालणारे उद्योगांचे नुकसान होत आहे.

सोयगावला १३२ वीज वितरण कंपनी केंद्र आहे. या मुख्य वीज केंद्रतून सोयगाव, जरंडी,फरदापुर या वीज उपकेंद्रांना वीज जोडणी केली आहे दरम्यान या उपकेंद्रांतुन परिसरातील गावांना विद्युत पुरवठा केला होतो. गेल्या काही दिवसांपासून अचानक कोणतीही पूर्व सूचना न देता कोणत्याही वेळी रात्री अपरात्री वीजपुरवठा खंडित केला जात आहे. वीज गेल्यावर तास न तास येत नाही. यामुळे मोठी गैरसोय होते. सोयगावसह परिसरा मजूर व कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. यामुळे त्यांची झोपही होत नाही.याबाबत स्थानिक वीज उपकेंद्रावर संपर्क साधला असता प्रतिसाद दिला नाही. अनेकदा उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. वीजपुरवठा केव्हा सुरळीत होईल, सांगता येत नाही असे बेजबाबदार उत्तर दिले जाते. विजेची अचानक मागणी वाढल्याने भारनियमन केले जात सांगितले जात आहे. यंदा पावसाळा चांगला झाला आहे. मात्र अचानक मागणी कशी वाढली? असा प्रश्नही पडत आहे. सोयगाव च्या ग्रामीण परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी होत आहे.

नागरिकांचे आरोग्य धोक्यात

ग्रामीण भागात रात्री अपरात्री सतत वीज खंडित होत असते त्यामुळे डासांचा वाढता प्रादुर्भाव व रात्रीच्या अंधारात पुरेशी झोप होत नाही . मात्र अचानक होणाऱ्या भारनियमनामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सोयगाव शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. डासांमुळे पुरेशी झोप होत नाही. डासांमुळे विविध आजारांनी डोके वर काढले आहे. वीज नसल्याने डासांवर नियंत्रण ठेवणे कठीण झाले आहे.

भाजीपाला पिकांचे नुकसान

सोयगाव परिसरात उन्हाचा तीव्र चटका बसत आहे. शेतीसाठी देखील सिंचन कसे करावे, असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे. भाजीपाला,कपाशी यासह इतर पिकांना पाण्याची अंत्यत गरज भासते. जरंडी, निंबा यती बहुलखेडा, घोसला या परिसरात मोठ्या प्रमाणात भाजीपाला पिके घेतली जातात. या पिकांना वेळेवर पाणी मिळणे गरजेचे असते. मुबलक पाणी असुनही शेतकरी विजेअभावी देऊ शकत नाही. यामुळे शेतकऱ्यांसमोर चिंता निर्माण झाली आहे. वीज जाण्यामुळे शेतकऱ्यांचे नियोजन कोसळले आहे. संबंधित विभागाने याचा विचार करून अचानक भारनियमन बंद करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा प्रदान !

दिलासा: खा.रजनीताई पाटील यांच्या मागणीला यश !

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

देशात आतापर्यंत सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. तमिळ भाषेला सर्वात आधी २००४ साली अभिजात दर्जा प्रदान करण्यात आला. त्यापाठोपाठ संस्कृत (२००५), कन्नड (२००८), तेलुगु (२००८), मल्याळम (२०१३) आणि ओडिया (२०१४) या भाषांना अभिजात दर्जा बहाल केला गेला. हा दर्जा मिळणे म्हणजे भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहोर उमटते. त्याच प्रमाणे केंद्र सरकारने आता मराठी भाषेला देखील अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे यासाठी अनेक वेळा राज्यसभेत काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.सौ. रजनीताई पाटील यांनी आवाज उठवला होता व या मागणीची दखल घेत केंद्र सरकारने अखेर ही मागणी पूर्ण केली त्याबद्दल केंद्र सरकार व खा. रजनीताई पाटील यांचे आभार व्यक्त होत आहेत. अभिजात दर्जा मिळाल्याने कोणते फायदे मिळणार? अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे २५०-३०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. भाषा भवन उभारणे, त्या भाषेतील ग्रंथ व साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथालये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेचा प्रसार यासह इतर प्रकल्पांसाठी आर्थिक पाठबळ दिलं जातं. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यास त्या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात. सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिजची स्थापना केली जाते. प्रत्येक विद्यापीठात त्या त्या भाषेचा अभ्यास करण्यासाठी विशेष केंद्र उभारलं जातं. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकण्याची व्यवस्था केली जाणार. प्राचीन ग्रंथांचा अनुवाद केला जाणार. भाषेला 'अभिजात दर्जा मिळण्याचे निकष काय? अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असायला हवी. त्या भाषेतील समृद्ध ग्रंथ व अन्य साहित्य परंपरा असावी. ते मूळ त्याच भाषेतील लिहिलेले असावे, अनुवादित नसावे. भाषेचा प्रवास अखंडित असावा आणि प्राचीन व सध्याच्या भाषेतील नाते सुस्पष्ट असावे, अशा सर्वसाधारण अटी आहेत. एखाद्या भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत राज्य सरकारकडून प्रस्ताव आल्यावर साहित्य अकादमीकडून पुराव्यांची छाननी होते. त्रुटींची पूर्तता झाल्यावर पुरावे योग्य असल्यास केंद्रीय सांस्कृतिक खात्याकडे शिफारस केली जाते व मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर केला जातो. मराठी भाषेने हे सर्व निकष पूर्ण केले आहेत. त्यामुळे हा निर्णय होत असताना खा. रजनीताई पाटील यांनी केलेली मागणी योग्य व मराठी भाषिकांचा सन्मान करणारी होती.

रेणुका मातेच्या दर्शनासाठी भाविकांचा ओघ

परंपरा: पालखी मिरवणूक अन् रावण दहन

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील भाविक-भक्तांची आराध्यदैवता श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. गुरुवार रोजी घटस्थापनेने या नवरात्रोत्सवास सुरुवात झाली आहे. तसेच बुधवार रोजी सातव्या माळेच्या दिवशी मातेची पालखी मिरवणूक मंदिर ते संपूर्ण गाव अशी हलकीच्या व टाळमृदंगाच्या गजरात संपन्न होणार असून शनिवारी विजयादशमी दिनी सायंकाळी ठीक ७ वाजता मंदिर परिसरात रावण दहनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी व जनतेने उपस्थित राहून या दैदिप्यमान कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ यांनी केले आहे.

दररोजच्या सकाळ व सायंकाळच्या मातेच्या आरतीस देखील भाविकांची उपस्थिती लक्षणीय असते. या नवरात्र महोत्सवाच्या दरम्यान दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ बुधवार रोजी सातव्या माळेला सायंकाळी ६ वाजता देवीची पालखी मिरवणूक मंदिरापासून ते संपूर्ण गाव अशा स्वरुपात टाळ-मृदंगाच्या, ढोल-ताशांच्या व हलकीच्या गजरात संपन्न होणार आहे. त्याचप्रमाणे दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ शनिवार रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता विजयादशमी दसरादिनी मंदिर परिसरातील डोंगरावर भव्य असा ३५ फुट उंचीचा रावण दहनाचा कार्यक्रम देखील मान्यवरांच्या शुभहस्ते व हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तसेच दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ बुधवार रोजी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महाप्रसाद दुधाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी वरील सर्व कार्यक्रमांस वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी व जनतेने उपस्थित राहून या दैदिप्यमान कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ, राहूल दुटाळ, बाळासाहेब दुटाळ, परशुराम दुटाळ यांनी केले आहे.

मुळा नदीपात्रात बुडून एकाचा दुर्दैवी मृत्यू

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी स्टेशन परिसरातील गावठाण येथील आशेचे द्वार प्रतिष्ठानचे आनंद जॉन मखरे वय ४५ हा मुळानदी पात्रात पोहण्यासाठी गेला असता त्यांना नदीपात्रातील पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांच्या मुळानदी पात्रात बुडून मरण पावल्याची घटना शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास घडली आहे.

राहुरी स्टेशन परिसरातील गावठाण येथील आनंद मखरे हे सामाजिक धार्मिक उपक्रमात अत्यंत हिरहिरीने सहभागी होत शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप तसचे गरजवंताना हिवाळ्यात उबदार शाल वाटप असे सामाजिक कार्यात सहभागी असायचे राहुरी तालुक्यात त्यांचा मोठा मित्र परिवार होता

आनंद माखरे हे शुक्रवारी दुपारच्या सुमारास आपल्या नातेवाईंका बरोबर मुळानदीकडे फेरफटका मारण्यासाठी गेले होते. वातावरणात कमालीचा उकाडा असल्याने त्यांना पाण्यात पोहण्याचा मोह आवरता आला नाही. त्यानंतर त्यांनी अंगावरील कपडे काढून नदीपात्रात उडी मारून नदीच्या पलीकडी काठावरं पोहत गेले. त्यानंतर पुन्हा परत येत असताना नदीपात्रात मध्यभागी आल्यानंतर त्यांचा पाण्यात दम तुटल्याने ते बुडाले. त्यांच्या समवेत असलेल्या नातेवाईकांनी आरडाओरड करून त्यांना वाचविण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, ते पाण्यात बुडाले. त्यानंतर राहुरी नगरपालिका आग्निशामक पथकाने व परिसरातीलतरूणांनी नदीपात्रात रात्री उशीरापर्यंत शोध घेतला मात्र, काल ते मिळून आले नाही. बारागाव नांदूर येथील पोहण्यात तरबेज असलेल्या काही तरूणांना पाचारण करून नदीपात्रात शोध सुरू केला. काल दुपारी २ वाजण्याच्या सुमारास राहुरी स्टेशन येथील रेल्वे पुलाखाली त्यांचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी राहुरीच्या ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आला. काल रात्री ७ वाजण्याच्या सुमारास त्यांच्यावर राहुरी स्टेशन येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. आनंद मखरे यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन बहिणी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.

माहेश्वरी महिला मंडळाकडून महाएक्सपो

कार्यक्रम: आजपासून होणार कार्यक्रमास होणार सुरुवात

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुका माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने दसरा दिवाळी सणाचे औचित्याने यावर्षी ही खास महिलांसाठी महिला महाएक्सपोचे आयोजन दि.७ व ८ ऑक्टोबर पासुन करण्यात आले आहे.तरी या महाएक्सपोचा महिलांनी लाभ घ्यावा.असे आवाहन माहेश्वरी महिला मंडळासह माहेश्वरी सभा, माहेश्वरी युवा संघटन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

माजलगाव तालुका माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने दसरा दिवाळी सणाचे औचित्याने खास महिलांसाठी महिला महाएक्सपोचे आयोजन केले आहे.हा महाएक्सपो सोमवार दि. ७ ऑक्टोबर पासुन राजस्थानी मंगलकार्यालय माजलगाव येथे चालु होत असुन, दोन दिवशीय महाएक्सपोत महिलांना एकाच छताखाली खरेदी करता यावी यासाठी विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात येणार आहेत. त्यामुळे महिलांना संसारोपयोगी साहित्यासह साड्या,कुर्तीज, फॅन्सी ड्रेसेस, सुंदर इमिटेशन ज्वेलरी,दिवाळी डेकोरेशन साहित्य, खास हॅन्डमेड वस्तु, स्नॅक्स, विविध प्रकारच्या बॅग ड पर्स, देवाचे पोशाख यासह इतर ही महिलांच्या संबंधित साहित्य खरेदीसाठी आपला वेळ एकाच ठिकाणी द्यावा लागेल.हा एक्सपो महिलांसाठी पर्वणीच ठरणार आहे.यासाठीचे नियोजन माहेश्वरी महिला मंडळासह माहेश्वरी सभा, माहेश्वरी युवा संघटन यांच्याकडून करण्यात आले आहे.तरी महिलांनी या खास महिलांसाठी असलेल्या महाएक्सपोचा लाभ घ्यावा.असे आवाहन ही माजलगाव तालुका माहेश्वरी महिला मंडळासह माजलगाव माहेश्वरी सभा, माहेश्वरी युवा संघटन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनो सोयाबीन विक्रिची घाई नको

धोरण:राज्य सरकारची महत्वपूर्ण बैठक

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

आर्थिक वर्ष २०२४ २५ साठी सोयाबीनचा हमीभाव हा ४८९२ रुपये इतका ठरला असून, तो गेल्यावर्षीपेक्षा २९२ रुपयांनी अधिक वाढला आहे. सोयाबीन खरेदीसाठी केंद्रही सुरु करण्यात आले असून, त्याची संख्या आणखी वाढवणार असल्याचे राज्य सरकारच्या वतीने सांगण्यात आहे. राज्यात सन २०२४-२५ मधील खरीप हंगामातील सोयाबीनची मोठ्या प्रमाणात पेरणी झाली आहे. केंद्र शासनाने सन २०२४-२५ साठी सोयाबीन करिता प्रति क्विंटल रू. ४८९२/- इतका हमीभाव घोषित केला आहे. सदर दर मागील सन २०२३-२४ या वर्षाच्या हमीभावापेक्षा रू.२९२/- प्रति क्विंटलने जास्त आहे. महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील सोयाबीन पिकाची केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात खरेदी सुरू करण्यासाठी केंद्रशासनातील नाफेड व एन.सी.सी.एफ. तसेच राज्यातील सर्व प्रमुख नोडल एजन्सीची राज्यस्तरीय आढावा बैठक पार पडली. सदर बैठकीमधील चर्चेनुसार हंगाम २०२४-२५ मध्ये राज्यात केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार नाफेड व महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई व विदर्भ पणन महासंघ नागपुर यांच्या वतीने राज्यात सोयाबीन खरेदीकरीता शेतकरी नोंदणी दिनांक ०१/१०/२०२४ पासुन सुरु करण्यात आली आहे.

निंबायती गाव परिसरात धूळफवारणी

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

निंबायती गाव येथे डेंग्यूच्या तापेने सहा वर्षीय बालिका फणफणली असल्याचे प्रकारामुळे रविवारी आरोग्य पथकांनी निंबायती गावात तळ ठोकून रुग्णांची सर्वेक्षण व उपचार मोहीम हाती घेतली गावात डेंगू सदृश तापेच्या एकही रुग्ण आढळून आला नसल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ विशाखा डुकरे यांनी सांगितले दरम्यान वैद्यकीय अधिकारी यांचेसह तेरा आरोग्य कर्मचारी पथक निंबायती गावात सात तास तळ ठोकून उपचार केले दरम्यान नागरिकांच्या आरोग्याचा काळजी म्हणून खबरदारी साठी रविवारी निंबायती ग्रामपंचायत व आरोग्य विभाग यांच्यावतीने धूळ फवारणी करण्यात आली यावेळी सात रक्त नमुने व पाच पाणी नमुने तपासणी साठी घेण्यात आले आहे दरम्यान आरोग्य विभागाच्यव सर्वेक्षणात गावात तापेच्या साथीचे रुग्ण आढळून आले नसल्याने आरोग्य विभागाने सुटकेचा श्वास सोडला आहे दरम्यान जिल्हा हिवताप अधिकारी रवींद्र ढोले तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ गीतेश चावडा यांनीही भेटी दिल्या यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ विशाखा डुकरे,यांच्या नेतृत्वाखाली निंबायती उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या चार गावांमध्ये साथ रोग सर्वेक्षण करण्यात आले तसेच गावामध्ये धूर फवारणी करण्यात आली व गावातील तसेच डेंगू पॉझिटिव्ह रुग्णांच्या घरातील व्यक्तींचे रक्त नमुने घेऊन डेंगू तपासणी केली यावेळी आरोग्य पथकामधे ज्ञानेश्वर पाटील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, दादाराव झोंड, संतोष सोहनी , राजेन्द्र कदम आरोग्य सेविका दुर्गा उघडे,अश्विनी हिवाळे , दिपाली राठोड जिल्हा हिवताप कार्यालया चे क्षेत्र कर्मचारी संतोष चव्हाण हे उपस्थित होते .

पारंपरिक जगप्रसिद्ध गरबा कलाकार उत्सुक

डोंबिवली 'नमो नमो गरबाची' चर्चा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई आणि महाराष्ट्रात डोंबिवलीचा नमो रमो गरबा आता फार प्रसिद्ध झाला आहे. सांस्कृतिक राजधानी म्हणून डोंबिवलीची कीर्ती सर्वत्र आहेच. पण गेली काही वर्ष नमो रमो नवरात्री या नावाने महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सवही डोंबिवलीतच साजरा केला जातो त्यात जगप्रसिद्ध गरबा कलाकार येण्यास उत्सुक असतात. यंदा गरबा क्वीन या विशेषणाने संबोधली जाणारी गीताबेन रबारी पुन्हा एकदा नवरात्रीचे नऊ दिवस आपल्या नमो रमो नवरात्रीचा उत्सव रंगतदार करण्यास येणार आहे सोबत ख्यातनाम गरबा गायक निलेश गढवी यांची साथ त्यांना लाभणार आहे.

नमो रमो नवरात्रीची संकल्पना रुजवणारे आणि सर्व संस्थांच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभे राहणारे डोंबिवलीचे लोकप्रिय आमदार आणि महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र दादा चव्हाण यांच्यामुळेच हा नवरात्री उत्सव अत्यंत भक्तिभावाने आणि पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. अतिशय भक्तिभावात हिंदू रीतीप्रमाणे अंबे मातेची प्रतिष्ठापना केली जाते. सकाळ संध्याकाळ विधिवत पूजा आरती करून महिषासुर मर्दिनीचा गजर करून देवीला नैवेद्य वाढून आवाहन केलं जातं आणि रात्री भव्य मंडपात देवीसमोर गरबा खेळाला जातो.

केवळ कल्याण डोंबिवलीच नाही तर ठाणे मुंबई वाशी पालघर आणि मुंबई बाहेरून गरबा खेळण्यासाठी पारंपारिक वेशभूषेत गरबा प्रेमी अवघी तरुणाई या नमो रमो नवरात्रीत उत्साहात सामील होते.नमो रमो नवरात्रीच्या स्थळांचं पावित्र्य तिथे मंडपातच उभारलेल्या अंबे मातेच्या मंदिरात आहे. आणि यंदाचं अजून एक प्रमुख आकर्षण म्हणजे मातेच्या या मंदिरात दररोज नव्या नव्या रंगांच्या ताज्या फुलांची सजावट करण्यात येणार आहे. ख्यातनाम पुष्परचनाकार श्याम भगत यांच्यातर्फे सजावट करण्यात येणार आहे.सालाबादप्रमाणे या वर्षीही सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक संजय धबडे ह्यांनी भव्य सेट उभारला आहे. तसेच यावर्षी पूर्ण वातानुकूलित ७० हजार स्क्वेअर फूट प्लेयिंग अरेना आहे. त्यासाठी स्वस्तिक इव्हेंट्सचे अनिल पासड ह्यांनी १३५ फूट बाय ५०० फूट अशा भव्य एसी डोमची निर्मिती केली आहे.

टीटू कुलकर्णी ह्यांचा जबरदस्त साऊंड असून दरवर्षी प्रमाणे यंदाही गरबा प्रेमींना सुरक्षित, निरोगी आणि आनंदी वातावरणात गरब्याचा मनमुराद आनंद लुटता यासाठी प्रत्येक छोट्या मोठ्या गोष्टींवर बारकाईने विशेष लक्ष देण्यात आले आहे. म्हणूनच एसी टॉयलेट्स, अनुचित प्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्ही आणि बाऊन्सर्सची प्रायव्हेट सिक्युरिटी या बरोबरच फूड कोर्ट, पार्किंग, सेल्फी पॉईंट्स अशी उत्तम व्यवस्था केली आहे. पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या पर्यावरण पूरक कचरा पेट्या बसविण्यात आल्या असून जलचर जीवन वाचवा (क्वा लाईफ) ही संकल्पना त्यातून मांडली आहे. संपूर्ण घरडा सर्कल परिसरात नमो रमो गरबामुळे एक अनोखी ऊर्जा वातावरणात निर्माण झाली आहे. मराठी हिंदी गुजराथी रंगभूमी मालिका आणि चित्रपट कलाकार नमो रमो नवरात्री उत्सवात दरवर्षी आवर्जून हजेरी लावत आहेत. या वर्षी दिलीप जोशी, यश सोनी, मल्हार ठाकर, श्रध्दा डांगर, सई मांजरेकर, गष्मिर महाजनी, करण टॅकर, रिधिमा पंडित, जितेंद्र जोशी, उर्मिला कानिटकर, मंजोत सिंघ, आशिम गुलाटी, आर्या जाधव गरबा प्रेमींना भेटण्यास येणार आहेत. प्रतिष्ठापना ते नवमी असा नऊ रात्रींचा गरबा एक आनंददायी आणि भरपूर ऊर्जा देणारा अनुभव असतो. दसऱ्याच्या दिवशी होणारं रावण दहन पाहण्यासाठी तर अलोट गर्दी होते. प्रत्यक्ष अनुभवायचं असेल तर आपणही नमो रमो नवरात्रीच्या खेळात कुटुंबासह सहभागी व्हा चला भक्ती आणि शक्तीचं स्वरूप असलेल्या अंबे मातेच्या नवरात्रीचे जागर करूया. दरम्यान ३ ते १२ ऑक्टोबर रोज रात्री ६ ते १० नमो रमो नवरात्री सावळाराम महाराज क्रीडा संकुल, घरडा सर्कल, डोंबिवली पूर्व, येथे साजरा होतो आहे.

पक्षाने उमेदवारी दिल्यास निवडणूक लढवू

संगीता ठोंबरे:केजचे वातावरण तापले!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या केज विधानसभा मतदारसंघाचे वातावरण तापले आहे जसे जसे वातावरण तापायला सुरुवात झाली तसेच माजी आमदार संगीता ठोंबरे केज मतदार संघामध्ये दौरे चालू केले पाच वर्षाच्या काळामध्ये केज मतदार संघाचा केलेला विकास जोरावर ही विधान सभा लढणार असल्याची माहिती माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी दिली आहे सविस्तर माहिती गेल्या काही महिन्यांपासून संगीता ठोंबरे या केज विधानसभा मतदारसंघात ठाण मांडून आहेत ठोंबरे यांनी काल पुणे येथे शरद पवार गटाच्या मुलाखती गेल्याने केज मतदार संघात आता वातावरण बदलले आहे माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी उमेदवारीची मागणी केली आहे केज विधानसभा मतदारसंघात जर विद्यमान आमदार यांचा पराभव करू शकतो तो एकमेव उमेदवार संगीता ठोंबरे आहेत जर संगीता ठोंबरे आणि विद्यमान आमदार यांची लढत झाली तर २०२४ ची पुनरावृत्ती झाल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे शरद पवार गटाने संगीता ठोंबरे यांना उमेदवारी दिली पाहिजे अशी चर्चा सध्या केज मतदार संघात होत आहे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने जर उमेदवारी दिल्यास पूर्ण ताकतीने निवडणूक लढणार असल्याचे माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी सांगितले.

प्रासंगिक

श्याम ठाणेदार
9922546295

'अभिजात मराठी...'



संपूर्ण महाराष्ट्राला व जगभरात पसरलेल्या मराठी जणांना अभिमान वाटावा अशी बातमी घटस्थापनेच्या दिवशी आली आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांचा ऊर अभिमानाने भरून आला. ती बातमी होती मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हे महाराष्ट्रातील तेरा कोटी जनतेचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार होण्यासाठी कैक दशकांची वाट पाहावी लागली मात्र उशिरा का होईना हे स्वप्न साकार झाले. यासाठी केंद्र सरकारचे मनापासून आभार मानावे लागेल, त्यासोबतच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी संघर्ष करणाऱ्या हजारो ज्ञात-अज्ञात व्यक्तींनाही सलाम करावा लागेल. केंद्र सरकारने मराठीसह पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांनादेखील अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. याआधी संस्कृत, तमिळ, तेलगू, कन्नड, उडिया, मल्ल्याळम् या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठीच्या श्रेष्ठत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. अर्थात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याचा प्रवास सोपा नव्हता. एक हजार वर्ष जुनी व पाच हजार बोलीभाषेपासून तयार झालेली अमृतातेही पैज जिंकणारी मराठी भाषा, अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळत नव्हता. मराठी भाषा ही मराठी संस्कृतीचा अस्सल आधार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शासकीय पातळीवर अनेकदा प्रयत्न झाले आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली होती, त्यासाठी आवश्यक असणारे सर्व पुरावे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे सोपवून नऊ वर्ष झाली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली १० जानेवारी २०१२ रोजी अभिजात मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आली होती. मराठी भाषेचे संशोधन करून व सूक्ष्म अभ्यास करून पुरावे गोळा करण्याचे काम या समितीकडे सोपवण्यात आले होते. प्रा. रंगनाथ पठारे यांच्यासमवेत प्रा. हरी नरके आणि व अन्य काही सदस्य या समितीत होते. या समितीने अतिशय सूक्ष्म अभ्यास करून मराठी भाषा अभिजात भाषेसाठी कशी पात्र आहे याचे सर्व पुरावे गोळा करून शासनाकडे सोपवले होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास विरोध करणारी याचिकाही उच्च न्यायालयाने फेटाळली, तरीही मराठी भाषा अभिजात दर्जापासून वंचित होती. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर मराठा भाषेच्या संवर्धनासाठी केंद्राकडून जास्तीचा निधी मिळेल त्यामुळे मराठी भाषेची उंची आणखी वाढेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेची प्रतिष्ठा आणखी वाढेल. आता मराठी भाषेच्या श्रेष्ठत्वावर राज्यमान्यतेची मोहर उमटली आहे. मुख्य म्हणजे आता मराठी भाषेच्या विकास कार्याला अधिक चालना मिळणार आहे. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांना सशक्त करण्यासाठी केंद्र सरकारकडून अधिकचा निधी मिळणार आहे त्यामुळे प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे सुलभ होणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने दरवर्षी मराठी भाषेतील दोन विद्वानांना राष्ट्रीय पुरस्कार मिळतील. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे याचा महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांना अभिमान आहे. म्हणूनच अभिमानाने म्हणावेसे वाटते

लाभले भाग्य आम्हास...
बोलतो मराठी....

दौंड, जि. पुणे

अन्वयार्थ

न.मा. जोशी
8805948951

'चन्द बगुले खा रहे हैं मछलियाँ...!'

लोगो की भीड देख के,
रस्ता नहीं बदलते हम,
किसी के डर से
ईरादा नहीं बदलते हम
अमीर कज़लबाश

काही योगायोग डोळ्यात असे काही अंजन घालणारे असतात की मानव जातीला चिंतन करणे भाग पडते. आता हे बघा दोन ऑक्टोबरला गांधी जयंती होती, त्या आधी एक दिवस अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांनी आयुष्याची शंभर वर्ष पूर्ण केली. जिमी कार्टर आणि गांधीजींनी परिवारवाद अर्थात घराणेशाही ही संकल्पना नाकारली होती. गांधींचा मुलगा हरिलाल याचा मृत्यू तर हलाखीच्या स्थितीत मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये झाला होता. गांधी आणि जिमी कार्टर दोघेही जागतिक शांतता आणि मानवतावादासाठी झटणारे जागतिक कीर्तीचे नेते.

आपल्याला आश्चर्य वाटेल की जिमी कार्टरच्या नावाने भारतातील हरियाणा राज्यातील गुरुग्राम (पूर्वाश्रमीचे गुडगाव) जिल्ह्यात ३ जानेवारी १९७८ला दौलतपुरचे 'कार्टरपुरी' असे नामांतर करण्यात आले. पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या विनंतीवरून मुख्यमंत्री देवीलाल यांनी हे नामांतर केले होते. अमेरिका 'कार्टरपुरी'ला दत्तक घेऊन कायापालट करेल ही कार्टर यांची ऑफर मोरारजींनी नाकारली होती. महात्मा गांधींची स्मारके तर जगभर आहेत.

हे सांगण्याचे कारण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचा भाजपा सातत्याने काँग्रेसवर घराणेशाहीचा आरोप करीत असतो. भाजपातही घराणेशाही ठासून भरलेली आहे. इतकेच नव्हे तर साऱ्या देशात घराणेशाहीचा उदोउदो सुरू आहे आणि त्याला लोकमान्यताही आहे. २९ सप्टेंबर रोजी तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी आपला मुलगा उदयनिधीला उपमुख्यमंत्री नियुक्त केले. त्यांच्यावर घराणेशाहीचा आरोप होत आहे.

वास्तविक पाहता उपमुख्यमंत्री नावाचे कोणतेही पद घटनेत नाही. १४ राज्यांमध्ये उपमुख्यमंत्री आहेत. यापैकी महाराष्ट्रासह ९ राज्यांमध्ये दोन-दोन उपमुख्यमंत्री आहेत. आंध्र प्रदेशात जगन मोहन रेड्डी मंत्रिमंडळात पाच उपमुख्यमंत्री होते.

उपपंतप्रधान पदही घटनेत नाही, पण आतापर्यंत वल्लभभाई पटेल, मोरारजी देसाई, चरणसिंग, जगजीवन राम, यशवंतराव चव्हाण, देवीलाल, लालकृष्ण अडवाणी असे सात उपपंतप्रधान झाले. (तरीही 'संविधान बचाव'?) तामिळनाडूतील डीएमकेमध्ये घराणेशाही नवीन नाही. २००९ मध्ये एम.के. स्टॅलिन यांना त्यांचे वडील आणि तत्कालीन मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांनीही उपमुख्यमंत्री केले होते. उदयनिधी आमदार झाल्यावर दीड वर्षातच मंत्री झाले, आता उपमुख्यमंत्री म्हणजे घटनेत नसलेले 'प्रमोशन'. १९६९ मध्ये सी. एन. अण्णा दुरई यांच्या निधनानंतर, डीएमके पक्षाची कमान करुणानिधी यांच्याकडे गेली, जे नंतर राज्याचे मुख्यमंत्रीही झाले. करुणानिधी यांची कन्या कनिमोझी लोकसभा खासदार आहे. स्टॅलिननंतर उदयनिधींच्या उदयाला द्रमुकमध्ये आव्हान नाही. काँग्रेसमध्ये घराणेशाही असल्याचा आरोप भाजपा करीत असतो.

पण गांधी घराण्याच्या असामान्य बलिदान आणि त्यागाला विसरणारा हा कृतघ्न देश नाही हे 'त्यांना' कोण सांगणार? काँग्रेस पक्षाला गांधी घराण्यानेच संजीवनी दिली आहे. भाजपाने 'काँग्रेस मुक्त भारता'चे धायमोकलून कितीही अरण्य रूदन केले तरी त्यांचे आक्रंदन म्हणजे

'खफ़ा हैं वे इस लिये की वे
चाहते हैं हम उन्हें सजदा करें'

यासाठी आहे हे जनता ओळखून आहे.

भारतीय लोकशाहीची वास्तविकता तर ही आहे की कम्युनिस्ट पक्ष वगळता साऱ्याच पक्षांमध्ये घराणेशाहीने पाय मजबूत रोवले आहेत आणि लोकांची त्यांना संमती आहे. ज्येष्ठ पत्रकार बलवीर पुंज यांनी घराणेशाहीचे राजकारण भारताला शाप आहे असे म्हटले आहे.

उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षात मुलायमसिंह यादव, नंतर त्यांचा मुलगा अखिलेश यादव वडिलांप्रमाणे उत्तर प्रदेशचा मुख्यमंत्री झाला आणि आज पक्षाचे नेतृत्व करत आहे. मुलायमसिंह यादव कुटुंबातील डिंपल यादव, शिवपाल यादव, धर्मेंद्र यादव, अक्षय यादव, अपर्णा यादव, अभिषेक यादव, प्रेमलता यादव, आदित्य यादव, सरला यादव, संध्या यादव, अपर्णा यादव, तेजप्रताप यादव, अभिषेक यादव, अरविंद यादव, शीला यादव असे एकाच कुटुंबातील डझनावारी सदस्य आमदार, खासदार, मुख्यमंत्री, मंत्री, जिल्हा परिषद, पंचायत समिती अध्यक्ष आणि सदस्यपर्यंतची सारी पदे आपल्या कवेत घेऊन आहेत.

बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलाची स्थितीही वेगळी नाही. राष्ट्रीय जनता दलाची स्थापना लालू प्रसाद यादव यांनी केली होती, जी आता त्यांचे पुत्र तेजस्वी यादव, तेजप्रताप यादव, आणि मिसा भारतीसह सात मुली सांभाळत आहेत. लालूप्रसाद यादव यांची पत्नी राबडी देवीसुद्धा मुख्यमंत्री होती. महाराष्ट्रात शरद पवार यांनी १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली होती, शरद पवार मुख्यमंत्री होते आणि केंद्रात खासदार आणि मंत्री होते. गेल्या वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फाटाफूट झाली. शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्ष आणि खासदार आहेत. त्यांचे पुतणे अजित दादा पवार एकनाथ शिंदे मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री आहेत. त्यांची पत्नी सुनेत्रा खासदार आहे. पुत्र पार्थ आणि पुतण्या रोहितही सक्रिय राजकारणात आहेत. सेना सुप्रीमो बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेतही पक्ष फुटण्यापूर्वी शिवसेनेची कमान बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र उद्धव आणि नातू आदित्य यांच्या हातात होती. विदर्भात नाईक घराणे, पारवेकर घराणे प्रसिद्ध आहेत. वसंतराव नाईक, त्यांचे पुत्र अविनाश नाईक, पुतणे सुधाकर नाईक आणि मनोहर नाईक, मनोहर नाईकांचे दोन्ही पुत्र ययाती नाईक व इंद्रनील नाईक, पुतण्या नीलय नाईक अशी मोठी यादी आहे जे सातत्याने अगदी १९५२ पासून सत्तेतच आहेत. आता मात्र नाईकांच्या सत्तेला आव्हान देणारी पिढी तयार झाली आहे. घराणेशाहीची किती नावे सांगावीत?

तृणमूल काँग्रेस आणि बहुजन समाज पक्षात 'बुआ भतिजा' (ममता-माया), (अभिषेक-आकाश) यांचे वर्चस्व आहे. काश्मीरच्या राजकारणात अनेक दशकांपासून शेख अब्दुल्ला, फारूक, ओमर आणि मुफ्ती (सईद-मेहबूबा-इल्तिजा) या दोन कुटुंबांचे वर्चस्व आहे, बिहारमध्ये लोक जनशक्ती पक्षही घराणेशाहीच्या आरोपांनी घेरला आहे, याची स्थापना रामविलास पासवान यांनी केली होती, ज्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे भाऊ पशुपतीकुमार तर आता त्यांचा मुलगा चिराग पासवान पक्षाचे नेतृत्व करत आहे. आंध्र प्रदेशात एन.टी.रामाराव यांच्या तेलगू देसम पक्षाची धुरा त्यांचे जावई चंद्राबाबू नायडू यांच्या हातात आहे. चंद्राबाबू नायडू मुख्यमंत्री आहेत तर त्यांचा मुलगा नारा लोकेश मंत्री आहे. कर्नाटकमध्ये माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांनी स्थापन केलेल्या जनता दल (धर्मनिरपेक्ष) मध्येही त्यांच्या कुटुंबाचे वर्चस्व आहे. ओडिशातील बिजू जनता दलाचीही तीच स्थिती आहे. पंजाबमधील शिरोमणी अकाली दलाचे नेतृत्व बादल कुटुंबाच्या हातात आहे, सध्याच्या काळात देशात कम्युनिस्ट अर्थात डावे पक्ष घराणेशाहीपासून मुक्त आहेत. भाजपात अटलबिहारी पंतप्रधान होते. ते विनोदाने म्हणायचे की अविवाहित आहे पण ब्रह्मचारी नाही.

अविवाहित असल्याने त्यांच्या बाबतीत घराणेशाहीचा प्रश्नच नाही. नरेंद्र मोदी विवाहित आहेत पण संसार केला नाही म्हणून त्यांना देखील परिवारवादाच्या आरोपांचा स्पर्श झाला नाही. 'फलसफा प्यार का तुम क्या जानो, तुम ने कभी प्यार ना किया, तुमने संसार ना किया' असा 'नवरत्नां'चे (२ मुले + ७ मुली), निर्माणकर्ते लालूप्रसाद यादव यांनी नरेंद्र मोदींना चिमटा काढला होता तेव्हा भारताची १४० कोटी जनता माझा परिवार आहे असा 'लाजवाब जवाब' देऊन मोदींनी लालूप्रसादची जिरविली होती. मोदींनी २०४७पर्यंत भारत विकसित होण्याचे स्वप्ने दाखवले असताना, या काळात भारतीय राजकारणात परिवारवादापासून मुक्त होण्याची चर्चा अनाठायी आहे असे म्हटल्यास ते चूक ठरु नये. वाईट वाटून घेण्याचे कारण नाही पण देशाचे वास्तव सांगणारा अन्वर जलालपुरी यांचा हा शेर पहा.

चन्द बगुले खा रहे हैं मछलियाँ
झील के बेचारे मालिक क्या करें.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक असून राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य आणि ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

यवतमाळ.

राशी-भविष्य

दि.६ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर २०२४

दिनविशेषः- दि.६ ऑक्टोबरः- विनायक चतुर्थी, **दि.७ ऑक्टोबरः-** ललिता पंचमी, **दि.८ ऑक्टोबरः-** सेवादास महाराज यात्रा, आष्टी, **दि. ९ ऑक्टोबरः-** सरस्वती आवाहन * आयंबील ओळी प्रारंभ, **दि. १० ऑक्टोबरः-** सरस्वती पूजन, घागरी फुंकणे, **दि.११ ऑक्टोबरः-** महाष्टमी उपवास, मिरज म. पुण्यतिथी, देवळी (वर्धा) **दि.१२ ऑक्टोबरः-** महानवमी, दसरा विजय मुहूर्त दु. १.५६ ते नवरात्रोत्थापन २.४३ पर्यंत.

मेष
वरिष्ठांचे दडपण राहील.
आपल्या कार्यक्षेत्रात वरिष्ठांचे दडपण राहील, तणावपूर्ण वातावरणात कामे करावे लागतील. कामावरील लक्ष विचलित होईल. जर तुम्हाला कोणी काही सल्ला दिलाच तर त्याकडे दुर्लक्ष करा.

वृषभ
निष्काळजीपणा सोडा.
तुम्हाला तुमच्या निष्काळजीपणामुळे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. तेव्हा नुकसान टाळण्यासाठी निष्काळजीपणा सोडा. आरोग्य उत्तम राहण्यासाठी योगसाधना फायद्याची ठरेल.

मिथुन
अडचणीवर मात कराल.
आपल्या पालकांनी केलेल्या मदतीमुळे अडचणीवर मात करू शकाल. रिकाम्या वेळेत तुम्ही तुमचे छंद जोपासण्याचा प्रयत्न केल्यास त्यातून तुम्हाला आनंद मिळेल, वेळही मजेत जाईल.

कर्क
वाहन सावकाश चालवा.
वाहन घसरणे व त्यामुळे होणाऱ्या अपघाताची शक्यता असल्याने वाहने सांभाळूनच चालवा, वेगावर नियंत्रण असू द्या. केलेल्या गुंतवणुकीचा फायदा होईल.

सिंह
आर्थिक लाभ.
तुमच्या मुलांच्या ओळखीने तुम्हाला तुमच्या व्यवसायात मदत होईल. मोठी ऑफर मिळेल. मुलांसोबत थोडा तरी वेळ घालविल्यास तुमचा थकवा/तणाव नक्कीच दूर होईल.

कन्या
प्रकृतीची चिंता नको.
तुमच्या प्रकृतीबाबत तुम्ही सतत चिंता करीत बसता तेव्हा तुम्ही प्रकृतीची चिंता सोडा. मनातील भीती काढून टाका. औषधोपचाराने तुमची प्रकृती अगदी ठणठणीत होईल.

तूळ
योजनांना गती द्या.
आपण व्यवसायासंदर्भात आखलेल्या योजनांना गती द्या. त्या कृतीत उतरण्यासाठी प्रयत्नशील राहा. योजना कृतीत उतरविण्यासाठी नियोजन करून कामे करा.

वृश्चिक
अनावश्यक मागण्या होतील.
तुमच्या जोडीदाराकडून अनावश्यक मागण्या होतील, पण तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करा. कुटुंबातील कर्तव्ये पार पाडतांना तारेवरची कसरत होईल. मोठे धाडस करू नका.

धनू
परिस्थिती नियंत्रणात येईल.
आपल्या कार्यक्षेत्रातील/ कुटुंबातील परिस्थिती नियंत्रणात येऊन सर्व व्यवहार सुरळीत होतील. कौटुंबिक वातावरण पूर्वपदावर येईल. आर्थिक स्थितीत बदल होईल.

मकर
प्रयत्नांना यश मिळेल.
आपण करीत असलेल्या प्रयत्नांना येणाऱ्या दिवसात नक्कीच यश मिळेल. भूतकाळातील गोष्टींचा विचार न करता वर्तमानात व भविष्यातील आपली कर्तव्ये ओळखा व कामाला लागा. यश नक्कीच मिळेल.

कुंभ
अधिकारपद मिळेल.
तुम्हाला नोकरीच्या ठिकाणी बढती मिळून अधिकारपद मिळेल. मित्रांकडून शुभ समाचार मिळतील. महिला वर्गाला विश्रांतीची आवश्यक भासेल.

मीन
बचतीचा विचार करा.
काहीही न करता बसून राहण्याची आपली सवय मानसिक शांतता बिघडवेल तेव्हा काहीतरी कामे करीत राहा. मिळालेल्या उत्पन्नातून बचतींचा विचार करा.

।। इति शुभं-भवतू ।।

अविनाश अंजनकर, अकोला

'लालपरी'मध्ये 'शिवनेरी सुंदरी'चे काय काम?

घोषणा करताना व्यावहारिकता, प्राथमिकता, उपलब्ध साधने, उत्पन्न खर्चाचा ताळमेळ याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. केवळ निवडणूक जुमला म्हणून घोषणा होऊ नये. 'शिवनेरी सुंदरी' चा एसटी आणि प्रवाशांना कितपत फायदा होईल याबाबत साशंकताच आहे, मात्र एसटीमध्ये सुधारणा होण्याची अधिक गरज असताना 'सुंदरी' ही एसटीची प्राथमिकता असू नये. जिथे जनतेच्या पैशाच्या विनियोगाचा मुद्दा येतो तिथे जनतेचे, तिजोरीची व्यापक हित न पाहता गैरनियोजन, गैरव्यवस्थापन याचा सार्वत्रिक अनुभव येतो, 'शिवनेरी सुंदरी' च्या बाबतीत असेच काही होत आहे का?

वर्तमान

अनंत बोरसे
9158495037

येणाऱ्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर काही दिवसांपूर्वीच महायुतीमधील शिंदे गटातील आनंदराव अडसूळ, संजय शिरसाठ त्याचबरोबर भरत गोगावले यांची विविध मंडळावर वर्णी लावली गेली ही सगळी मंडळी दोन वर्षांपासून मंत्रिपद मिळेल या अपेक्षेवर होते, अनेकांनी कोटदेखील शिवून ठेवले होते, मात्र मंत्रिपद मिळत नाही म्हणून यापैकी अनेकांनी त्रागा केला, काहींनी आशाच सोडून दिली होती. भरत गोगावलेंची खद्खद् अनेकदा समोरदेखील आली होती. अखेर त्यांना एसटी महामंडळाचे अध्यक्ष बनवण्यात आले आणि लागलीच त्यांनी नवीन काहीतरी करून दाखवावे म्हणून एसटीच्या कामकाजात लक्ष घालत, एसटीच्या स्थानकावर आरोग्य सेवा, महिला बचतगटातर्फे खाद्यपदार्थांचे स्टॉल या संकल्पना मांडल्या, त्या स्वागतार्ह आहे. मात्र, बरोबर त्यांनी-पुणे शिवनेरी प्रवासात 'शिवनेरी सुंदरी' सेवा देण्याची संकल्पना मांडली, ती मात्र वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे किंवा ना ती एसटीला ना प्रवाशांना फायदेशीर ठरु शकेल.

जून १९४८ रोजी तत्कालीन मुंबई राज्यात मुंबई राज्य रस्ते वाहतूक महामंडळ म्हणून स्थापन केलेल्या कंपनीला सार्वजनिक वाहतुकीचा एकाधिकार दिला गेला आणि जनतेची प्यारी लालपरी, 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ध्येय आणि 'गाव तिथे रस्ता, रस्ता तेथे एसटी' हे ब्रीद वाक्य घेऊन राज्यभर धावू लागली. राज्यातील विशेषतः ग्रामीण भागातील जनतेला दळणवळणासाठी मोठा आधार आहे, गेल्या ७५-७६ वर्षात 'लालपरी 'मधे अमूलाग्र बदल झाला आहे, लाल डब्बा ही प्रतिमा बदलून एसटी आता एशियाड, परिवर्तन बस, शिवशाही, शिवनेरी ते आता सेमी स्वरुपात धावू लागली आहे. जवळपास २५० बस आगार, ६०० च्या वर बसस्थानके, ३,४०० पिक अप शेल्टर, एक लाखाच्या वर कर्मचारी वर्ग, अठरा हजार सहाशेच्या वर

बसेस, १२ विभागीय कार्यालये, ६ प्रादेशिक कार्यालये असा या लालपरीचा विस्तार आहे. एसटी हे स्वतंत्र परिवहन महामंडळ असले तरी त्यावर नियंत्रण राज्य सरकारचे आहे आणि एसटीच्या कामकाजात आजवरच्या सर्वच राजकीय पक्षांचा, राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप राहिला आहे. १९८२ साली देशात दिल्लीत एशियन खेळांचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी खेळाडूंना नेण्यासाठी आरामदायी बस पुरवण्याचे कंत्राट एसटी महामंडळाला देण्यात आले होते, तेव्हा ज्या आरामदायी बसेस पुरवल्या गेल्या त्या पुढे 'एशियाड बस' म्हणून एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्या. साधी लालपरी, हिरकणी, यशवंती, शिवनेरी, शीतल, एशियाड, शिवशाही, सेमी-स्लिपर अशा विविध बसेस दररोज राज्यभर अविरत जनतेला सेवा देत आहेत. ग्रामीण भागातील प्रवासी हा एसटीचा मोठा वर्ग असताना खासगीकरण आणि कंत्राटीकरणाच्या अट्टाहासापायी गेल्या काही वर्षांपासून एसटीमध्ये महागडे प्रयोग केले जात आहे, एसटी तोट्यात असताना अहमदाबाद येथील कंपनीकडून शेकडो शिवशाही बसेस भाड्याने घेतल्या गेल्या आणि तो एसटीसाठी पांढरा हत्ती ठरला आहे. काही वर्षांपूर्वी विदर्भातील एका राज्यमंत्र्यांच्या अट्टाहासापायी थेट अहेरी ते मुंबई सेवा सुरू केली होती मात्र भारमान नसल्याने, आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने ती बंद करावी लागली, अनेकदा भारमान नसतानाही कुणाच्यातरी अट्टाहासापायी बससेवा सुरू केली जाते आणि जिथे खरोखरच बससेवा गरजेची आहे तिथे मात्र दुर्लक्ष केले जाते. अगोदरच एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते वेळेवर दिले जात नाही, शहरीभाग सोडला तर जवळ जवळ ६०-७० टक्के बसेस भंगार अवस्थेत आहे. त्याचबरोबर वारंवार होणाऱ्या तिकिट दरवाढीने प्रवासी अन्य मार्ग शोधतात आणि त्याचा परिणाम एसटीच्या उत्पन्नावर होत आहे. शासनाच्या अनेक योजना, सवलती, एसटीमार्फत राबविल्या जातात मात्र त्याचा परतावा एसटीला वेळेवर दिला जात नाही. एसटी कर्मचाऱ्यांची तर व्यथाच वेगळी! तुटपुंज्या वेतनावर आयुष्यभर राबूनदेखील तोंडाला पाने पुसली जाणारे अत्यल्प निवृत्ती वेतनावर वृद्धापकाळातील आयुष्य जगावे लागते. गेल्या वर्षी एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाने हे वास्तव समाजासमोर आले. अत्यल्प वेतन तेदेखील वेळेवर मिळत नाही, न्यायालयात मान्य करूनदेखील, वेतन देण्याची तारीख पाळली जात नाही, कर्मचाऱ्यांना वारंवार आंदोलने करावी लागतात. एसटीचे आधुनिकीकरण होणे गरजेचे आहे, मात्र त्यासाठी सरकारने आर्थिक बळ दिले पाहिजे. मात्र, अशावेळी तिजोरीचा खडखडाट पुढे केला जातो. सरकारची तिजोरी रिकामी, एसटी तोटा चिंता वाढविणारा तरीदेखील सवलतींचा भडिमार होत आहे. एसटी महामंडळाच्या अनेक जागा आहे त्याचा व्यापारी तत्त्वावर योग्य वापर करून उत्पन्न वाढवता येऊ शकते. बऱ्याच वर्षांपूर्वी अनेक आगारांचे व्यापारी संकुलात रूपांतर करण्याचे ठरले. मात्र, अनेक ठिकाणी हे काम अर्धवट आहे. याबाबत आमच्या शहापूर बस स्थानकाचे उदाहरण बोलके आहे. शहापूर (ठाणे) आगारात बाहेरच्या डेपोतील भंगार, गळक्या, सतत नादुरुस्त होणाऱ्या बसेस पाठविल्या जातात, सुमारे आठ-नऊ वर्षांपूर्वी मोठा गाजावाजा करून शहापूर बसपोर्टचे भूमिपूजन झाले. मात्र, अजूनही ते काम अर्धवट अवस्थेत आहे, अशीच स्थिती अनेक ठिकाणी आहे. यामध्ये कालापव्यय तर होतो मात्र आर्थिक नुकसानदेखील होते. आजच्या घडीला बसचे भाडे हे जवळपास एक रुपया अंशी पैसे पडते. दर सणासुदीला एसटीची भाडेवाढ होते आणि त्याचा बोजा प्रवाशांवर पडतो, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नुकत्याच पार पडलेल्या गणेशोत्सवात 'एसटी'ने चांगली कमाई केली, पण कमाईचा योग्य विनियोग व्हायला हवा.

घोषणा करताना व्यावहारिकता, प्राथमिकता, उपलब्ध साधने, उत्पन्न खर्चाचा ताळमेळ याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. केवळ निवडणूक जुमला म्हणून घोषणा होऊ नये. 'शिवनेरी सुंदरी' चा एसटी आणि प्रवाशांना कितपत फायदा होईल याबाबत साशंकताच आहे, मात्र एसटीमध्ये सुधारणा होण्याची अधिक गरज असताना 'सुंदरी' ही एसटीची प्राथमिकता असू नये. जिथे जनतेच्या पैशाच्या विनियोगाचा मुद्दा येतो तिथे जनतेचे, तिजोरीची व्यापक हित न पाहता गैरनियोजन, गैरव्यवस्थापन याचा सार्वत्रिक अनुभव येतो, 'शिवनेरी सुंदरी' च्या बाबतीत असेच काही होत आहे का?

शहापूर, जिल्हा ठाणे.

कवडसा

प्रा.डॉ.मोहन खडसे
9823289010

'लपलेलं बळ...!'

जी माणसं इतरांना कमी लेखतात, त्रास देतात, प्रसंगी छलकपट करतात, हे त्यांचं कर्म आहे असं माणसाने जर मनात घेतलं, तर त्याला आपोआप अशांततेकडून शांततेकडे जाता येतं. जगात छल होणार आणि कपटसुद्धा होणार, समर्थन मिळणार, विरोध होणार, चांगलं म्हटलं जाणार, वाईट म्हटलं जाणार असं माणसाला वाटणं, अत्यंत आवश्यक आहे म्हणजे त्याचं संतुलन कायम राहतं. एखाद्या माणसाच्या अडचणी किंवा त्याला होणारा त्रास, हा त्याच्या दुःखद अवस्थेला पाहून कुणी कमी करत नसतं, हेच खरं आहे. मग यावर काही उपाय आहे काय? होय नक्कीच आहे तो असा की माणूस स्वतःला बदलू शकतो, विचारात परिवर्तन करू शकतो आणि स्वतःवर नियंत्रण करू शकतो. कुणाला असतील तर, अशाच प्रकारे काही प्रश्न आणि समस्यांना कमी मात्र नक्की करता येत हेही तितकेच खरे.



काही प्रश्न, काही समस्या, काही अडचणी या येणारच असतात, असं जर माहीत असलं आणि ते माणसाने मान्य केलं तर मग दुःखाचे नेहमी कारण असते काय? परिस्थितीप्रमाणे वेळेनुसार काही दुःख ही येतच असतात, असं जेव्हा त्याच्या मनात असेल तर त्याला त्रास होत नाही, पण तरीही त्रास का होतो तर त्याचं कारण आहे. ते असं की अमुक एक दुःख किंवा त्रास किंवा अडचण मला येऊ नये असं त्याला माणसाला वाटत असतं आणि त्याच्या वाटण्यानुसार निसर्गाने किंवा जगाने राहावं असं शक्य तरी आहे काय? मुळीच नाही कारण प्रत्येक क्षणी, प्रत्येक वेळी निसर्गाने साथ द्यावी अन् आपल्या आसपासच्या परिस्थितीने नेहमी सोबत करावी, असं माणसाला वाटणं, मुळात त्याला अडचणीत टाकणार असतं.

एखाद्या गोष्टीमुळे माणसाला दुःख का होतं? तर त्याला त्याच्या मनाला कुणी त्रास दिला, काही अमान्य केलं, विरोध केला तर त्याला दुःख होण्याची शक्यता असते. ही शक्यता का असते तर माणूस हे मनात ठेवून राहतो की कुणीही त्याच्यासोबत अमानवीय व्यवहार, छलकपट करू नये, ही त्याची इच्छा असते. मात्र, त्याच्या इच्छेनुसार सगळं घडत नसतं, हे खरं आहे. पण सर्वच माणसं त्याच्या बाजूने असतील असं त्याला वाटणं चुकीचं सिद्ध होतं, हेही तितकेच खरे आहे. जगात सकारण आणि विनाकारण विरोध असू शकतो हे ज्या वेळेला माणसाला मान्य होतं त्यावेळेला त्याच्या दुःखाची तीव्रता नक्कीच कमी झालेली असते. माणसानं चांगल्या अन् अनुकूल गोष्टींना, क्षणांना, माणसांना न विसरण्याचा सतत प्रयत्न करत राहावा. आत्ता नाही केलं पण पूर्वी बरंच सहकार्य केलंय, हे विसरून कसं चालेल?

कोणत्याही माणसाचं अनुकूल-प्रतिकूल असणं लक्षात ठेवणारी माणसं, संतुलन कायम ठेवू शकतात.

जी माणसं इतरांना कमी लेखतात, त्रास देतात, प्रसंगी छलकपट करतात, हे त्यांचं कर्म आहे असं माणसाने जर मनात घेतलं, तर त्याला आपोआप अशांततेकडून शांततेकडे जाता येतं. जगात छल होणार आणि कपटसुद्धा होणार, समर्थन मिळणार, विरोध होणार, चांगलं म्हटलं जाणार, वाईट म्हटलं जाणार असं माणसाला वाटणं, अत्यंत आवश्यक आहे म्हणजे त्याचं संतुलन कायम राहतं. एखाद्या माणसाच्या अडचणी किंवा त्याला होणारा त्रास, हा त्याच्या दुःखद अवस्थेला पाहून कुणी कमी करत नसतं, हेच खरं आहे. मग यावर काही उपाय आहे काय? होय नक्कीच आहे तो असा की माणूस स्वतःला बदलू शकतो, विचारात परिवर्तन करू शकतो आणि स्वतःवर नियंत्रण करू शकतो. कुणाला असतील तर, अशाच प्रकारे काही प्रश्न आणि समस्यांना कमी मात्र नक्की करता येत हेही तितकेच खरे.

कुणीतरी एक संदेश पाठविला होता - 'समजून घेणाऱ्या व्यक्तीवरच समजून घेण्याची जबाबदारी जास्त असते. समजदार व्यक्ती कधीच गैरसमज करून घेत नाही आणि गैरसमज वाढविणारी व्यक्ती कधीच समजदार होत नाही.'

माणसाच्या शरीरात काही विकार निर्माण झाला किंवा काही असंतुलन झाले अर्थात काही आजार झाला तर त्याचे शरीर स्वतःहून त्या आजाराशी लढण्याचा प्रयत्न करते, असं भारतीय आरोग्यशास्त्रात आणि इतरही शास्त्रात म्हटलं आहे. निसर्गानं तशी यंत्रणा माणसाच्या शरीरात कायम केलेली आहे मात्र त्यासोबतच काही पथ्य आणि औषधांचा वापर हा या यंत्रणेचा वेग वाढवत असतो. याचाच अर्थ असा की माणसाच्या जगण्यामध्ये त्याच्या शरीरात मनात आणि आसपास नक्कीच काहीतरी लपलेलं बळ हे असतं ज्याची जाणीव माणसाला असणे आवश्यक आहे. हे बळ म्हणजे कधी व्यक्त होणारं, तर कधी व्यक्त न होणारं, कधी जाणवणारं तर कधी न जाणवणारं, असं इतरांच्या शुभेच्छा आणि सद्भावनेच बळ असतं. कुणी व्यक्त केलं नाही म्हणजे माणसासाठी सद्भावना नाहीत, असं थोडीच असतं? प्राणवायू दिसत नाही म्हणजे तो नाही, असं म्हणता तरी येतं का?

एका हॉटेलमधील गर्दीला लक्षात घेऊन, एक माणूस त्या गर्दीत शिरायचा काहीतरी थोडसं खायचा अन् गर्दीचा फायदा घेऊन तिथून निसटायचा. बरेच दिवस हे एका ग्राहकाने पाहिलं आणि शेवटी मालकाला सांगितलं. तेव्हा मालक म्हणाला, 'एकदा मी या माणसाच्या मागे गेलो, त्याचा पाठलाग केला. तो माणूस एका देवीच्या देवळात थांबला अन् हात जोडून म्हणाला - 'मी ज्या हॉटेलमधून पैसे न देता थोडंसं खाऊन निघालो तिथे अशीच गर्दी राहू दे म्हणजे मला मला माझ्या गरिबीमुळे तिथे काही खाता येईल. आमची दोघांची नजरानजर झाली पण कुणीही बोललं नाही पण व्हायचा तो परिणाम झाला. प्रसिद्ध शायर अख्तर शिरानी यांच्या शब्दात सांगायचं म्हणजे -

क्या कह गई किसी की नजर
कुछ न पूछिये
क्या क्या हुआ है दिल पे असर
कुछ ना पूछिये'

या माणसाची प्रार्थना अन् भावना म्हणजे माझं लपलेलं बळ आहे, ते मी कसं काय दुर्लक्षित करणार?'

(प्रस्तुत लेखक हे प्रसिद्ध स्तंभ लेखक, शिक्षणतज्ज्ञ असून त्यांच्या 'सावित्री फाऊंडेशन, अकोला' च्या माध्यमातून सक्रिय सामाजिक, शैक्षणिक कार्य करतात)
अकोला, ईमेलः mvkhadse9@gmail.com

आधी इराणच्या आण्विक तळांवर हल्ला करा

डोनाल्ड ट्रम्प यांचा इस्रायलला सल्ला

वृत्तसंस्था...

वॉशिंगटन : आपल्यासाठी सर्वात मोठा धोका म्हणजे अण्वस्त्रे. त्यामुळे आधी इराणच्या आण्विक तळांवर हल्ला करा, नंतर बाकीची चिंता करा, असा सल्ला अमेरिकचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलला दिला आहे. उत्तर कॅरोलिना येथील एका कार्यक्रमात ते बोलत होते. विशेष म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी मध्यपूर्वेतील युद्ध टाळले पाहिजे, असे आवाहन केल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी हा सल्ला दिला आहे.

यावेळी ट्रम्प यांना इराणबद्दल तुमचे मत काय आहे, अशी विचारणा करण्यात आली. यावर ते म्हणाले की, आपल्यासाठी सर्वात मोठा धोका म्हणजे अण्वस्त्रे. त्यामुळे सर्वात आधी इस्त्रायलने इराणच्या आण्विक तळांवर हल्ला करायला हवा. बाकीची काळजी नंतर करायला हवी होती. जर ते (इराण) करणार असतील तर ते करतील; पण त्यांच्या योजना काय आहेत ते आम्ही शोधून काढू. अमेरिकेचे

राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी इस्त्रायलच्या इराणमधील आण्विक तळांवर हल्ल्यास विरोध केला होता. ते म्हणाले होते की आम्ही इस्रायलबरोबर चर्चा करणार आहोत. इस्रायलला इराणला प्रत्युत्तर देण्याचा अधिकार आहे; पण त्यांनी मर्यादेत राहूनच प्रत्युत्तर दिले पाहिजे.

जनसामान्यांचा राहुल गांधी बनले आवाज

१०० दिवसांचा कार्यकाळ पूर्ण

देशोन्नती वृत्तसंकलन

नवी दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांनी १०० दिवसांचा कार्यकाळ पूर्ण केला. त्या पदावर कार्य करताना राहुल यांनी दिलेल्या योगदानाची कॉंग्रेसने तोंडभरून प्रशंसा केली. राहुल जनसामान्यांचा आवाज बनले आहेत. ज्यांचा आवाज ऐकला जात नाही; त्यांचा ते आवाज बनले आहेत, असे त्या पक्षाने म्हटले.

कॉंग्रेसचे नेते पवन खेडा यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून राहुल यांची सक्रियता अधोरेखित केली. विरोधी पक्षनेतेपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर राहुल यांनी देशभर भ्रमण केले. शेतकरी, कामगार, लोको पायलट आणि

समाजातील विविध घटकांची त्यांनी गाऱ्हाणी ऐकली. त्या घटकांचा आवाज ऐकला जावा, त्यांच्याशी संबंधित मुद्दे संसदेसमोर यावेत याची निश्चिती त्यांनी केली, असे खेडा यांनी म्हटले. मणिपूरमधील हिंसाचारामुळे प्रभावित झालेल्या जनतेसाठी आवाज उठवण्यापासून ते अयोग्य सरकारी धोरणांना विरोध करण्यापर्यंत राहुल सातत्याने वंचित आणि पीडितांच्या पाठीशी उभे राहिले आहेत. मागील दाराने सरकारी भरतीसारख्या (लॅटरल एन्ट्री) पावलाला त्यांनी विरोध दर्शवला. ते पाऊल सरकारला मागे घेणे भाग पडले. राहुल यांच्यामुळे काही निर्णयांवरून सरकारला घुमजाव करावे लागले. ते धर्मनिरपेक्ष मूल्यांचे रक्षण करत आहेत. राजकारणापेक्षाही त्यांची वचनबद्धता सामान्य जनतेप्रती अधिक असल्याचे दिसून येत आहे, असे निरीक्षण खेडा यांनी नोंदवले. लोकसभेच्या मागील २ निवडणुकांत (वर्ष २०१४ आणि २०१९) कॉंग्रेस आणि इतर

निवडणूक आयोगाच्या कानउघाडणीनंतर पोलीस प्रशासनाची कारवाई

१११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

वृत्तसंस्था

नवी मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने एका पदावर तीन वर्ष पूर्ण झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले होते. मात्र, यावर पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या वेळेत न केल्याने निवडणूक आयोगाने पोलीस महासंचालकांची कानउघाडणी केली होती. यानंतर आता १११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने ३१ जुलै रोजी पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश दिले होते. तसेच आदेशाचा अनुपालन अहवाल २० ऑगस्टपर्यंत सादर करण्याचे निर्देशही दिले होते. मात्र, त्यानंतर बदल्या करण्यात झाल्या नाहीत. मुंबईतील १३० पोलीस अधिकाऱ्यांची मध्यावधीत बदली करण्यास गृह खात्याने असमर्थता दर्शवली होती. मध्यावधी बदलीचा पोलीस अधिकाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर विपरित परिणाम होण्याची भीती गृह खात्याने वर्तवली होती. मात्र, वेळेत बदल्या न केल्याने निवडणूक आयोगाने पोलीस महासंचालकांची कानउघाडणी करत त्यांच्यासह राज्याच्या मुख्य सचिवांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्यानंतर पोलीस महासंचालकांनी याप्रकरणी आता कार्यवाही केली आहे. पोलीस महासंचालकांनी मुंबईतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक अशा एकूण १११ अधिकाऱ्यांच्या मुंबईबाहेर बदल्या केल्या आहेत.

मुंबई पोलीस दलाला मिळाले ११ नवे अधिकारी

शहाजी नारायण पवार (सोलापूर), संजय पंडित पाटील, कैलास दादाभाऊ डोंगरे, जनार्दन सुभाष परबकर (रायगड), वैभव कांतीनाथ शिंगारे, गिरीश गणपत बने, मालोजी बापूसाहेब शिंदे (ठाणे), अनिल भाऊराव पाटील (नंदूरबार), संजय पांडुरंग पाटील (सांगली - पोलीस प्रशिक्षण केंद्र) आणि गजानन दत्तात्रय पवार (गुन्हे अन्वेषण विभाग) या अधिकाऱ्यांची मुंबईत बदली करण्यात आली आहे. त्यामुळे आता मुंबई पोलीस दलाला ११ नवे अधिकारी मिळाले आहेत.

नऊ वर्षांनंतर भारतीय मंत्री जाणार पाकिस्तानला ?

१५ ऑक्टोबरला एससीओ बैठक

देशोन्नती वृत्तसंकलन

नवी दिल्ली : परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर १५-१६ ऑक्टोबरला पाकिस्तानला भेट देणार आहेत. ते इस्लामाबादमध्ये एससीओ कौन्सिल ऑफ हेड्स ऑफ गव्हर्नमेंटच्या (सीएचजी) बैठकीत सहभागी होतील. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी ही माहिती दिली आहे. ९ वर्षात पहिल्यांदाच भारतीय मंत्री पाकिस्तानला भेट देणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेत जयशंकर यांचा दौरा भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्याचा प्रयत्न आहे का,

असा प्रश्न जयस्वाल यांना विचारण्यात आला. यावर त्यांनी उत्तर दिले की भारत एससीओ चार्टरसाठी वचनबद्ध आहे. जयशंकर यांच्या भेटीचे हे कारण आहे. यावरून दुसरा अर्थ काढू नये. २९ ऑगस्ट रोजी पाकिस्तानने पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटीसाठी आमंत्रित केले होते.

मुख्यमंत्री नितीश कुमार यांना भारतरत्न द्या

पाटणामधील पोस्टरने लक्ष वेधले

वृत्तसंस्था...

पाटणाः बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना भारतरत्न देण्याची मागणी जनता दल युनायटेडच्या समर्थकांनी केली आहे. राजधानी पाटणा येथील जेडीयूच्या प्रदेश कार्यालयाबाहेरील पोस्टरने सर्वांचे लक्ष वेधले आहे. जदयूचे सरचिटणीस छोटू सिंह यांनी हे पोस्टर लावले आहे. या पोस्टरनंतर राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

जेडीयूने आज शनिवार, ५ ऑक्टोबर २०२४ रोजी पक्ष कार्यालयात राज्य कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक बोलावली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री नितीश कुमार होते. त्याआधी पटनाच्या वेगवेगळया चौकात पोस्टर लावण्यात आले आहेत. या पोस्टरमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा मोठा फोटो आहे,

स्कूबा डायविंग करणारे सरडे पाण्यात बुडबुडे कसे करतात?

वृत्तसंस्था...

न्यूयॉर्क : एका अनोख्या संशोधनात वैज्ञानिकांनी स्कूबा डायविंग करणारे सरडे पाण्यात बुडबुडे कशासाठी निर्माण करतात याचे कारण शोधून काढले आहे. अमेरिकन वैज्ञानिकांनी या नव्या संशोधनातून स्कूबा डायविंग करणारे सरडे पाण्यात श्वास घेणे आणि शिकाऱ्यांपासून वाचण्यासाठी बुडबुड्यांचा वापर करत असल्याचे शोधले ओ. या सरड्यांना जंगलाच्या चिकन नगेट्स म्हटले जाते.

वॉटर एनोल्स नावाची ही प्रजाती कोस्टा रिकाच्या उष्णकटिबंधीय जंगलांमध्ये

आढळून येणारा एकप्रकारचा अर्ध-जलीय सरडा आहे. हा स्वतःची शिकार करणारे पक्षी आणि सापांपासून वाचण्यासाठी या अनोख्या तंत्रज्ञानाचा वापर करतो. न्यूयॉर्कच्या बिंगहॅमटन विद्यापीठाच्या डॉ. लिंडसे स्विएर्क यांनी प्रथम पाण्यात बुडबुड्यांचा वापर करत या प्रजातीची माहिती मिळविली होती. सरड्यांना जेव्हा एखाद्या शिकारीपासून धोका जाणवतो, तेव्हा ते पाण्यात शिरतात आणि श्वास घेण्यासाठी स्वतःच्या डोक्यावर एक बुडबुडा तयार करतात. हा सरडा दीर्घकाळापर्यंत पाण्यात राहू शकतो असे लिंडसे यांनी सांगितले आहे. श्वसनात या बुडबुड्याची प्रत्यक्षात कुठलीही खास भूमिका होती की नाही हे त्यांना माहीत नव्हते. बुडबुडे श्वसनात कुठलीही सक्रिय भूमिका बजावतात का केवळ हे एक बायप्रॉडक्ट आहे. तपासण्यासाठी लिंडसे यांनी सरड्यांच्या त्वचेच्या पृष्ठभागावर एक पदार्थ लावला जो बुडबुडे निर्माण होण्यापासून रोखतो. हे सरडे किती बुडबुडे तयार करता आणि कितीवेळ पाण्यात राहू शकतात.

रतलाम येथे रेल्वेवाहतूक सुरळीत

रतलाम : मध्य प्रदेशात रतलाम विभागात रेल्वे वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली आहे. गुरुवारी रात्री उशिरा या भागात एक मालगाडी रुळावरून घसरल्याने रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली होती.

या घटनेचा फटका संपूर्ण उत्तर भारतातील रेल्वे वाहतुकीला बसला होता. मात्र, आता रेल्वेमार्गावरील सर्व अडथळे दूर करण्यात आले असून वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. मालगाडी रुळावरून घसरल्याने १५ महत्त्वाच्या रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक कोलमडले होते. रतलाम रेल्वे विभाग हा पूर्व भारत आणि पश्चिम भारत यांना रेल्वेने जोडणारा महत्त्वाचा दूवा आहे.

झारखंडमधील आमदाराचा अजित पवार गटाला रामराम

वृत्तसंस्था

रांची : झारखंडमधील आमदार कमलेशसिंह यांनी शुक्रवारी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाला रामराम ठोकला. त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. ते अजित पवार गटाचे त्या राज्यातील एकमेव आमदार होते. झारखंडमधील विधानसभा निवडणूक जवळ येऊन ठेपली आहे. त्या निवडणुकीच्या तोंडावर सिंह यांच्या पक्षबदलाची घडामोड घडली.

त्यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी यांच्या उपस्थितीत त्या पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले. त्यावेळी भाजपचे झारखंड निवडणूक

निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेश

सहप्रभारी असणारे आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा हेही उपस्थित होते. काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्रातील राजकारणात उलथापालथी घडून राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये फूट पडली.

त्या पक्षाचे विभाजन दोन गटांमध्ये झाले. त्यानंतर सिंह यांनी अजित पवार गटात जाणे पसंत केले. त्यांनी झारखंडमधील सत्तारूढ आघाडीचा पाठिंबाही काढून घेतला. त्या सत्तारूढ आघाडीमध्ये झामुमो, कॉंग्रेस आणि राजदचा समावेश आहे.

मुलीच्या अपहरण हत्याप्रकरणी हिंसाचार उसळला

वृत्तसंस्था

कोलकाताः पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात कोचिंग क्लाससाठी घरातून बाहेर पडताना एका मुलीचे अपहरण करून तिची हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर पश्चिम बंगालमध्ये पुन्हा एकदा लोकांचा संताप आणि निदर्शने उफाळून आली आहेत. आंदोलकांनी पोलीस चौकीची तोडफोड करून ती पेटवून दिली. सध्या शवविच्छेदनाची प्रतीक्षा आहे.

मुलीवर अत्याचार झाल्याचा भाजपचा दावा

दरम्यान, भाजपने हे बलात्कार आणि हत्येचे प्रकरण असल्याचा दावा केला आहे.

ऑगस्टमध्ये कोलकात्याच्या आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येवरून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि पश्चिम बंगाल सरकार आधीच टीकेला सामोरे जात आहे.

बुल ट्रॉलिंग करणाऱ्या दोन बोटी जप्त

मत्स्योद्योग खात्याची धडक कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन

पणजी : मत्स्योद्योग खात्याने गोव्याच्या सागरी हद्दीत अवैधपणे घुसून बुल ट्रॉलिंग करणाऱ्या मालपे कर्नाटक येथील दोन बोटी जप्त केल्या. ही घटना शनिवारी पहाटे पाचच्या दरम्यान घडली. या कारवाईत किनारी पोलीस आणि स्थानिक मच्छीमारांनीदेखील सहभाग घेतला होता. पकडलेल्या बोटींवरील माशांचा लिलाव करून बोट मालकांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मंत्री नीळकंठ हळर्णकर यांनी स्पष्ट केले आहे.

गेले काही दिवस मालपे येथील बोटी गोव्याच्या सागरी हद्दीत घुसून बेकायदेशीरपणे मासेमारी करत असल्याची तक्रार स्थानिक मच्छीमारांनी केली होती. त्या बोटीवरील मच्छीमारांनी स्थानिकांना दमदाटी केल्याचा आरोपही झाला होता. याबाबत काही दिवसांपूर्वी पोलिसात तक्रारही दाखल करण्यात आली होती. यानंतर मंत्री नीळकंठ हळर्णकर यांनी कर्नाटक मत्स्योद्योग खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची चर्चा केली होती. मात्र, तरीही मालपे येथील बोटी गोव्याच्या हद्दीत येण्याचे प्रकार सुरूच होते. यानंतर मत्स्योद्योग खात्याने असे प्रकार रोखण्यासाठी विशेष टास्क फोर्सची नियुक्ती केली.

सिंधुदुर्ग : मच्छीमारी करून परत येत असताना एक बोट निवती समुद्रात उलटली. या घटनेत दोन खलाशी बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली आहे. सदर घटना पहाटे दोन ते तीनच्या दरम्यान घडल्याचा अंदाज आहे. या बोटीत १४ खलाशी होते. त्यातील २ खलाशी बेपत्ता आहेत. इतरांनी दुर्घटनेनंतर किनाऱ्यावर येत आपले जीव वाचवले.

सोमनाथ परिसरात बुलडोझर ॲक्शनला स्थगिती नाही

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने गुजरातमध्ये सोमनाथ मंदिरानजीक जारी बुलडोझर ॲक्शनवर स्थगिती देण्यास तूर्तास नकार दिला आहे. न्यायालयाने सोमनाथ मंदिरानजीक ईदगाह आणि दरगाह समवेत अनेक अवैध बांधकाम आणि अतिक्रमणाच्या विरोधात बुलडोझर कारवाई करण्यावरून गुजरात सरकारकडून स्पष्टीकरण मागविले आहे. न्यायालयात आता याप्रकरणी १६ ऑक्टोबर रोजी पुढील सुनावणी होणार आहे. सोमनाथ मंदिरानजीक गुजरातच्या प्रभास पाटनमध्ये दरगाह आणि मशिदींसमवेत अनेक बांधकामे पाडविण्याच्या विरोधात जैसे थे स्थिती राखण्याचा आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकरने बजावला मतदानाचा हक्क

वृत्तसंस्था

झज्जरः हरियाणामध्ये आज ५ ऑक्टोबर रोजी विधानसभेच्या ९० जागांसाठी मतदान झालेत. नुकतेच ऑलिम्पिक पदक विजेती आणि भारतीय नेमबाज मनू भाकरने झज्जरमधील मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी ऑलिम्पिक पदक विजेती आणि भारतीय नेमबाज मनू भाकर म्हणाली, 'हे माझे पहिले मतदान आहे. मला वाटते की, या देशातील तरुण म्हणून आपले मत देणे ही आपली जबाबदारी आहे. जो योग्य वाटेल त्यालाच मतदान करा. देशाचा विकास आपल्या हातात आहे. आपल्याला आपला जनप्रतिनिधी निवडला पाहिजे.

'तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीं वरील पोस्टमद्वारे मतदान करणाऱ्याचे आवाहन केले आहे. आज हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे. मी सर्व मतदारांना आवाहन करतो की, लोकशाहीच्या या पवित्र उत्सवात सहभागी होऊन मतदानाचा नवा विक्रम प्रस्थापित करा. या निमित्ताने राज्यातील सर्व तरुण मित्रांना माझ्या विशेष शुभेच्छा जे पहिल्यांदाच मतदान करणार आहेत.

दरम्यान, हरियाणात सत्ताधारी भारतीय जनता पक्ष (भाजप) सलग तिसऱ्यांदा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचवेळी १० वर्षांनंतर पुन्हा सत्तेत येण्यासाठी काँग्रेस जोरदार प्रयत्न करत आहे.

चीन सरकारने कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय वाढवले

वृत्तसंस्था

बीजिंग :सरकारी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय वाढवण्याची घोषणा केली आहे. या निर्णयानंतर आता सर्व पुरुष कर्मचारी वयाच्या ६३ व्या वर्षी निवृत्त होतील तर महिला कर्मचारी ५५ ते ५८ या वर्षी निवृत्त होतील. चीनमध्ये सातत्याने कमी होत असलेली लोकसंख्या आणि कर्मचाऱ्यांचे वाढते वय लक्षात घेऊन निवृत्तीचे वय वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कामाचा कालावधी वाढवणे हे चीन सरकारचे उद्दिष्ट आहे. जेणेकरून चीनमधील कमी होत जाणारे कर्मचारी आणि कमकुवत अर्थव्यवस्था यामुळे पेन्शन फंडाची कमतरता भरून काढता येईल.

युक्रेनच्या पायाभूत सुविधांवर ड्रोन हल्ला!

कीव : रशिया आणि युक्रेनमधील युद्ध अधिक उग्र बनले आहे. दरम्यान, रशियाने युक्रेनच्या अनेक महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर भयानक ड्रोन हल्ला केला. या भीषण रशियन ड्रोन हल्ल्यात युक्रेनचे अनेक तळ उद्ध्वस्त झाले. या कालावधीत १ व्यक्तीचा मृत्यू झाला असून ४ जण जखमी झाले आहेत. युक्रेनचे म्हणणे आहे की रशियाने त्याच्या गंभीर पायाभूत सुविधांवर १९ ड्रोनने हल्ला केला.

मोठ्या संख्येने भारतीय अजूनही इस्रायलमध्ये?

वृत्तसंस्था...

इस्त्रायल : मध्यपूर्वेत सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने आपल्या नागरिकांना इराणमध्ये जाणे टाळण्यास सांगितले होते. याशिवाय लेबनॉन आणि इस्रायलमधील लोकांनाही सुरक्षित ठिकाणी राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. याशिवाय अत्यावश्यक कामांसाठी घराबाहेर न पडण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. भारताच्या

भारतीय तरुणांनी या संधीचा फायदा घेतला आणि हजारो इस्रायलमध्ये रोजगार मिळवण्यासाठी हरियाणा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र सारख्या राज्यांमधील भरती केंद्रांबाहेर रांगेत उभे आहेत. मोठ्या पगाराचे आमिष अनेक भारतीय कामगारांना आकर्षित करत आहे. कुशल कामगार शक्तीसाठी भारत इस्रायलसाठी एक पसंतीचे केंद्र बनले आहे.

१००० भारतीय कामगार इस्रायलला गेले

अलीकडील एका उपक्रमात, इस्रायलच्या लोकसंख्या, इमिग्रेशन आणि बॉर्डर अथॉरिटी (PIBA) ने NSDC ला १०,००० बांधकाम कामगार आणि ५,००० काळजीवाहकांची भरती करण्याची विनंती केली, याविषयीचे वृत्त एका इंगजी वर्तमानपत्राने दिले आहे. डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत १६,८३२ उमेदवारांनी कौशल्य चाचणी दिली.

परराष्ट्र मंत्रालयाचे म्हणणे आहे की, पश्चिम आशियामध्ये सुमारे ९० लाख भारतीय राहतात, त्यांची सुरक्षा ही आमची प्राथमिकता आहे

भारतीयांची परतण्याची योजना नाही

आणि हे केवळ संवादातूनच शक्य आहे. हवाई हल्ले आणि बॉम्बस्फोटांमुळे सतत तणाव असूनही, मोठ्या संख्येने भारतीय अजूनही इस्रायलमध्ये राहत आहेत.

तुतारीच्या उमेदवारीसाठी चढाओढ

पडघम शरद पवार परळीसाठी कुणाला देणार पसंती ?

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी मतदारसंघात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत, महायुतीची उमेदवारी ना.धंनजय मुंडे यांना निश्चित आहेच.महाविकास आघाडीचा उमेदवार मात्र अद्याप निश्चित नाही.महाविकास आघाडीचा उमेदवार निश्चित नसला तरी ना.मुंडे सावध भूमीका घेत असतांना दिसत आहेत. महाविकास आघाडी कडून अर्धा डझन इच्छूक उमेदवार आहेत. ते सर्व आपापल्या पद्धतीने पक्ष श्रेष्ठी कडे तिकीटासाठी फिल्डींग लावून बसले आहेत परंतु ह्या इच्छूक उमेदवारा पैकी महाविकास आघाडी कडे तिकीटासाठी परळीतून सासू - जावया मध्ये चढाओढ असल्याचे पहावयास मिळत आहे . हे सासू-जावई म्हणजेच सुधामतीताई गुट्टे व राजेभाऊ फड आहेत. शरद पवार यांच्या विचाराशी निष्ठावंत असणा-या सुधामती ताई गुट्टे फार अगोदर महाविकास आघाडी कडून तिकीटासाठी इच्छूक आहेत, त्यांचा मुलगा सुनील गुट्टे यास उमेदवारी साठी त्यांचे प्रयत्न आहेत. तर दुसरी कडे सौ.गुट्टे यांचे जावई राजेभाऊ फड

पान २ वर...

तिकीट सासू-जावयापैकी एकाला का ? ऐन वेळी तिसऱ्याला ? :

परळी च्या तिकीटासाठी महाविकास आघाडी कडे गुट्टे ,फड सासू - जावई अतोनात प्रयत्न करत मतदारसंघात दौरे करत आहेत. पंरतु शरद पवार यांनी कुणाचे तिकीट निश्चित केलेले नाही. मग तिकीट ह्या सासू-जावई दोघा पैकी एकाला मिळते का ? ऐन वेळी पवार तिसराच चेहरा समोर येतो कि काय ? अशीही चर्चा परळी मतदारसंघात आहे. पवारांनी मराठा कार्ड काढले तर काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख सर्वात पुढे आहेत. सासू- जावई इतर ओबीसी चेहरा निवडला तर संजय दौंड ह्या नावाची देखील चर्चा परळी मतदारसंघात होतांना दिसत आहे .

साडेतीन लाखाचे सोयाबीन जळून खाक!

नुकसान:आर्थिक मदत देण्याची मागणी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे लाखा येथील तीन शेतकरी यांनी मागील दाहा दिवसांपुर्वी त्यांच्या मालकीची जमिन सर्वे नं.७२/१,५२/२,५२/४ मधिल ०२हे. ५३ आर जमिनीमधील काढलेल्या सोयाबीन पिकाची वेगवेगळ्या तीन गंज करुन ताडपत्रीने व्यवस्थित पणे झाकुन ठेवले होते दी ३/१०/२०२४ रोजी शेतकरी शेख नसिब शेख हबीब, शेख वशिर शेख हवीव , शेख शफिक शेख नसिब सर्व रा. कळंब ता. कळंब जि. धाराशिव हे तीघे जण त्यांचे लाखा येथील नातेवाईक मयत झाले म्हणून रात्री ११ वाजता लाखा या ठिकाणी गेले असता दी ४/१०/२०२४ रोजी पहाटे २ वाजताच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने सोयाबीन काढणी केलेल्या तिन्ही शेतकऱ्याच्या गंजी

पान २ वर...

मनोज जरांगे पाटीलांची भेट!

पडघम:पाटील म्हणाले केजमध्ये बदल निश्चित

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

काल अंतरवली सराटी येथे संघर्ष योद्धा मराठ्यांचे क्रांतीसुर्य आदरणीय मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट घेतली व विविध समस्या त्यांच्या कानावर घातल्या १२ तारखेला होणाऱ्या नारायण गडावरील दसऱ्या मेळाव्यासाठी १८ पगड जमातीतील कार्यकर्ते जमा होणार ऐतिहासिक व मराठा समाजाचा पहिला दसरा मेळावा ऐतिहासिक ठरावा म्हणून सर्व मराठा सेवक तरुण वयोवृद्ध कामाला लागलेली आहे आपल्या आपल्या परीने सोशल मीडियावर कॉर्नर बैठका घेऊन दसरा मेळाव्याचे महत्त्व पटवून सांगत आहे तसेच अठरापगड जातीतील लोक ,मनोज दादा जरांगे यांच्या कार्याला वाहून घेणारे व आपले दैवत म्हणणारे मदन परदेशी हे ओबीसी समाजाचे आहेत एडवोकेट विशाल घोबाळे एस सी समाजाचे आहेत असे असंख्य कार्यकर्ते आहेत मदनलाल परदेशी,अगळे महाराज, सुधाकर शिंदे सुंदर अवताडे पत्रकार रोहन गलांडे हे मराठा समाजाचे असे असंख्य १८ पकड जातीमध्ये लोक नारायण गडावरील दसरा मेळावा ऐतिहासिक व अभूतपूर्व ठरवण्यासाठी कामाला लागलेले आहेत व दसरा मेळावा या ठिकाणी त्या मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी त्या ठिकाणी आपापल्या समाज बांधवांना घेऊन उपस्थित

पान २ वर...

रिपाइं मध्यस्तीने उपोषण सुटले

नियोजन: सर्व पक्षीय नेत्यांची यशस्वी शिष्टाई

नगर /पुण्यभूमी प्रतिनिधी

नगरपरिषद श्रीगोंदा आरोग्य विभाग कंत्राटी कामगारांच्या वतीने दिनांक ३/०९/२०२४ रोजी पासून सुरू असलेले अमरण उपोषण आज दिनांक ०५/०९/२०२४ रोजी म्हणजेच तिसऱ्या दिवशी रिपाइं (ए) चे जिल्हाधयक्ष निलेशभाऊ गायकवाड तसेच काँग्रेस नेते घनश्यामजी अण्णा शेलार, भाजपचे नेते विक्रम दादा पाचपुते आदी सर्वच माजी माजी नगरसेवक पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या मध्यस्थीने उपोषण सोडवण्यात आले

काँग्रेस नेते घनश्यामजी अण्णा शेलार यांनी सांगितले की नगरपरिषद कंत्राटी कामगारांना आपल्या हक्काचे पैसे मागण्यासाठी जर उपोषण करावे लागत असेल आणि त्यांना चार चार महिन्याचे वेतन दिले जात नसेल तर ही निंदनीय आहे विक्रम दादा पाचपुते म्हणाले की नवरात्री मध्ये गेल्या तीन दिवसापासून महिलांचा उपवास घडलेल्या आहेत परंतु अशी परिस्थिती परत येऊ नये हे सदबुद्धी देवीने नगर परिषदेच्या कंत्राट दाराला देवो ही इच्छा व्यक्त केली कुठल्याही मागण्यासाठी किंवा प्रश्नांसाठी उपोषणाची वेळ येऊ नये अशी ताकीतच कंत्राट दारासमोर देण्यात आली

या उपोषणाला जाहीर पाठिंबा असलेले रिपाइं (-) च्या वतीने अहमदनगर दक्षिण जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड म्हणाले आत्तापर्यंत नगरपरिषदेमध्ये वेळोवेळी काय पत्रव्यवहार केलाय हे त्यांनी इथे नमूद केले मागील एक वर्षापासून ज्या काही कामगारांच्या अडीअडचणी आहे त्याचा लेखाजोखा सर्वांसमोर मांडण्यात आला येत्या काळामध्ये माननीय दीपक भाऊ निकाळजे रिपाइं (-) चे राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या आदेशाने नगरपरिषद श्रीगोंदा कंत्राटी कामगारांना

पान २ वर...

टोच्या शिटवर लक्षवेधी छायाचित्र

प्रकार:शालेय विद्यार्थीनी करतात दररोज प्रवास



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

खेड्यापाड्यातून शिक्षणासाठी विद्यार्थीनींना खाजगी वाहनांचा आधार घेत सिरसाळ्यात यावे लागते, सर्व गावात बस सुविधा नाही म्हणून विशेषता टो सेवा उपलब्ध आहे. पंरतु टो मध्ये प्रेमाची गाणे ऐकण्या बरोबर आता बॉलिवूड अभिनेत्रींचे लक्ष वेधी फोटो पाहून शालेय विद्यार्थीनींना प्रवास करावा लागत आहे . हा असा प्रकार खेडेगाव ते सिरसाळा वाहतूक करणारे बरेच टो चालक करत आहेत. शालेय विद्यार्थीनी या वाहनातून प्रवास करतात हे माहित असतांना देखील संबंधित चालकांना अभिनेत्रींचे अश्लील हवभावाचे फोटो लावण्याची काय आवश्यकता आहे. ? असा सवाल निर्माण होत आहे . काही वर्षा पुर्वी असाच प्रकार घडला होता तेव्हा पोलीसांनी याची दखल घेऊन संबंधित वाहन चालकांना सुचना करत हे छायाचित्र हटवले होते.

महिलांच्या कलागुणांना होम मिनिस्टरमुळे संधी!

डॉ. ज्योती मेटे : महिलांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसंग्रामच्या वतीने नवरात्र उत्सवात जागर मातृ शक्तीचा हे अभियान राबवण्यात येणार आहे. यानिमित्त नवरात्र काळात संबंध महाराष्ट्रत महिलांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणारा होम मिनिस्टर (खेळ रंगला पैठणीचा) हा भव्य कार्यक्रम दि. ०७ ऑक्टोबर रोजी दुपारी ११ वा. आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड, बीड येथे जागर मातृशक्तीचा या कार्यक्रमांतर्गत निखळ मनोरंजनातून महिलांचे आत्मभान जागविण्यासाठी आमचा एक छोटासा प्रयत्न म्हणून न्यू होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे आणि या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी केले आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्री ही पूजनीय आहे, याला अनेक शतकांची परंपरा आहे. पूजनीय असतानाच गार्गी, मैत्रेयी सारख्या स्त्रिया देखील भारतीय संस्कृतीमध्ये होऊन गेलेल्या आहेत. सृष्टीची जननी असणाऱ्या स्त्रियांनी वेगवेगळ्या कालखंडामध्ये महान सामाजिक कार्य करीत स्वतःला सिद्ध केले आहे. जिजाऊ माँसाहेब, राजमाता अहिल्यादेवी होळकर, महाराणी ताराराणी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, झाशीची राणी, माता रमाई, फातिमा शेख यांचे ऐतिहासिक कार्य काळाच्या पटलावर कोरले गेलेले आहे.

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर नानाविध क्षेत्रामध्ये महिलांनी उत्तुंग भरारी घेतले असल्याचे आपणास दिसते. नोकरी व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण हा महाराष्ट्रातील महिलांसाठी मैलाचा दगड ठरणाऱ्या बाबी आहेत. तथापि यात ग्रामीण भागातील महिलांनी देखील अग्रेसर राहणे आवश्यक आहे. सामाजिक जाणीव प्रगल्भ करण्याबरोबरच महिलांच्या सशक्तीकी करण्यासाठी लोकनेते विनायकराव मेटे त्यांनी शिवसंग्रामच्या माध्यमातून अविरत प्रयत्न केले आहेत. लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या अकाली निधनानंतर त्यांचे अपुरे कार्य पुढे चालू ठेवण्याचा आम्ही निरंतर प्रयत्न करीत असून, त्याचाच एक भाग म्हणून नवरात्रोत्सवा दरम्यान जागर मातृशक्तीचा या कार्यक्रमांतर्गत निखळ मनोरंजनातून महिलांचे आत्मभान जागविण्यासाठी आमचा एक छोटासा

पान २ वर...

मातंग समाज अधिकार मोर्चात सामील व्हा

अमोल शेरकर :चळवळ साहित्यिक अण्णाभाऊ साठे पुरस्कारासाठी

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

हक्क हे मागून मिळत नसतात त्यासाठी संघर्ष करावा लागतो किंवा ते हिसकावून घ्यावे लागतात. या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणीचा पाया अंगीकृत करून समाजाच्या विविध मागण्या मान्य करून घेण्यासाठी, समाज सत्तेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व समाजाच्या विविध मागण्यासाठी ११ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालय माजलगाव येथे मातंग समाज अधिकार मोर्चाचे आयोजन अमोल शेरकर यांनी केले आहे. या मोर्चात आण्णाभाऊंना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यासाठी राज्य सरकारने केंद्राला प्रस्ताव पाठवावा.

अ.ब.क.ड. आरक्षण वर्गीकरण लवकरात लवकर करावे.माजलगाव शहरात आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह उभे करावे. आण्णाभाऊ साठे महामंडळ सुरु करून महामंडळातील पारदर्शक कारभाराची हमी राज्य सरकारने द्यावी.गायरान जमीनींना कायदेशीर चौकटीत बसवून संरक्षण द्यावे. पदोन्नतीत

पान २ वर...

चर्चा यंदा मात्र पानिपत निश्चित

मुंदडा राजकारणाला उतरती कळा!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

निवडणूकांचे बिगुल कधीपण वाजू शकते. प्रत्येक राजकिय पक्षाला आणि त्यांच्या नेत्यांना विजयाची आस लागलेली आहे. गत पाच वर्षात विकास कामांवर सत्ताधारी बोलत आहेत तर विरोधक हे सत्ताधारी किती कुचकामी ठरले हे सांगत फिरत आहेत. तर विरोधासाठी विरोध करण्यांचीही एक टिम निर्माण झालेली आहे. बीड जिल्ह्यातील एकमेव आरक्षीत मतदार संघ असलेल्या केज विधानसभा क्षेत्रात २०१४ चा अपवाद बगळता मुंदडा घराण्याने तब्बल ३० वर्ष आमदारकी मिरवली आहे. स्व. विमलताई मुंदडा यांच्या पाठीशी असलेली जेष्ठ नेते तिसरा डोळा नंदकिशोर मुंदडा यांची संघटन शक्ती हे त्यांना पाच वेळेस आमदार करण्यास कारणीभूत ठरली. २०१९ ला सुध्दा नंदूसेठ यांनीच आपल्या सुनेसाठी दारोदार फिरल्यामुळे नमिता मुंदडा आमदार बनल्या. मात्र लोकहिताचे कोणते मोठे प्रकल्प मुंदडांमुळे केज विधानसभा क्षेत्रात आले हे त्यांना आजपर्यंत सांगता आले नाही. ते राहात असलेल्या अंबाजोगाई नगर पालिकेची सत्ता त्यांनी कधीच मिळवता न आल्याचा इतिहास आहे. यंदा मात्र मुंदडा घराण्याच्या विरोधात बाताबरण निर्मिती होत असून २०२४ ला मुंदडांना घरी पाठवण्याचा निर्धार विरोधक करु लागले आहेत. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मनापासून साथ न दिल्यास मुंदडांचा आजच पराभव झाला असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही. काही दिवसापुर्वीच मुंदडा समर्थकांनी स्व. विमलताई मुंदडा यांचा फोटो महापुरुषांच्या पंक्तीत बसवून स्वतःच्या अकलेचे तारे तोडले आहेत. नंदकिशोर मुंदडा यांचा दांडगा जनसंपर्क एव्हढीच मुंदडा घराण्याची ताकद आहे. कार्यकर्त्यांचा पत्ता नाही, गुत्तेदार पोसण्यासाठी आणि त्यातून मलई लाटण्यासाठी आमदारकीचा मुंदडांनी नेहमीच उपयोग केल्याचे दिसते. केज मतदार संघात विकासाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी मुंदडांना देण्यात आलेली ३० वर्ष कमी आहेत की काय? अजून किती वर्ष मुंदडांनी जनतेच्या भावनांशी खेळून आपली राजकिय कारकिर्द वाढवायची याला पण मर्यादा आहेत की नाहीत? सक्षम विरोधक तयार न होवू देता प्रत्येकाला पैशाचे गाजर दाखवून तर कधी दमदाटी करुन मुंदडा आमदारकी भुषवत आहेत. नंदुसेठ यांचे दिवटे चिरंजीव अक्षय हे तर कोण कोणत्या कारणाने प्रसिध्द आहेत हे अंबाजोगाई शहरासोबतच

पान २ वर...

एज्युकेशन सोसायटीचा आदर्शवत उपक्रम

नियोजन: प्रश्नमंजुषा, लेखन स्पर्धेला प्रतिसाद

परळी पुण्यभूमी/ प्रतिनिधी.

महेबूबिया एज्युकेशन सोसायटीचे सचिव सय्यद हनिफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई यांच्या मार्गदर्शनाखाली, महेबूबिया एज्युकेशन सोसायटी आणि अंजुमन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने सीरत-उन-नबी चार दिवसीय 'सीरत-उन-नबी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. ४ ऑक्टोबर २०२४ ते ७ ऑक्टोबर २०२४, ज्यामध्ये सर्व उर्दू माध्यम शाळांमधील विद्यार्थ्यांनी लेखन स्पर्धा, नात पठण, भाषण आणि क्विझ स्पर्धा यासह विविध स्पर्धात भाग घेतलेला आहे.

आज सीरत-उन नबी उत्सवाचा पहिला दिवस होता, शुक्रवार ४ ऑक्टोबर २०२४ रोजी, इमदादुल उलूम शाळा आणि अंजुम उल उलूम मुलींच्या शाळेत ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी लेखी परीक्षेत शिस्तबध्दता व उत्साहाने भाग घेतला. विद्यार्थ्यांना कार्बन कॉपीसह ओएमआर शीट आणि स्वतंत्र प्रश्नपत्रिका देण्यात आले होते. आज सुमारे ६१२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. परिक्षा दोन शिफ्टमध्ये घेण्यात आली. परीक्षा समितीचे प्रभारी सय्यद अन्वर सर, परीक्षा सहप्रमुख खान बकश सर, सीरत कार्यक्रमाचे संयोजक मो. अतीक रज्जाक सर, सय्यद विरासत सर, अब्दुल गफ्फार सर आणि एआय एक्सपर्ट अबू तल्हा यांनी आपले

पान २ वर...